नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २३५ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### अवैध गौण खनिज उत्खनन ठिकाणी अचानक भेट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : विधानमंडळ अंदाज समितीने आज, शुक्रवारी अचानक शहराजवळील कापूरवाडी व वारूळवाडी येथील अवैध गौण खनिज उत्खनन ठिकाणाला भेट दिली. यासंदर्भात महसूल व वन विभागाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. या अवैध गौण खनिज उत्खननाची कोट्यवधी रुपयांच्या दंडाची रक्कम अद्याप वसूल झालेली नाही. यासह संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्याचे आदेश समितीने दिले आहेत. विधानमंडळ अंदाज समिती काल गुरुवारपासून जिल्ह्यातील कामांची तपासणी व आढावा घेण्यासाठी दौऱ्यावर आलेली आहे काल पहिल्या दिवशी समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्यासह केवळ सात सदस्य उपस्थित होते. परंतु आज सदस्य एकूण सोळा सदस्य उपस्थित होते. समितीने आज सकाळी अचानक नगर शहराजवळील, पाथर्डी रस्त्यावरील वारूळवाडी व कापूरवाडी परिसरातील अवैध खनिज उत्खनन ठिकाणाला भेट दिली. या ठिकाणासंदर्भात राज्य सरकारकडे तक्रारही झालेल्या आहेत.

### कुंभमेळ्यासाठी गुजरातचे कंत्राटदार?

अहिल्यानगर (स. गांवकरी) : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज एका पत्रकार परिषदेत बोलताना नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याची बहुतांश कामे गुजरातच्या कंत्राटदारांना दिल्याचा आरोप केला होता. महाराष्ट्रात कंत्राटदार जन्मालाच आले नाहीत का? असा सवालही राज ठाकरे यांनी सरकारला केला होता. राज ठाकरे यांच्या या टीकेनंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत प्रत्युत्तर दिलं आहे. 'गुजरातच्या कंत्राटदारांना कामं दिले वैगेरे हे सर्व खोटं आहे. आपण कुंभमेळ्याच्या कामांची कंत्राटं हे स्पर्धात्मक पद्धतीने दिलेले आहेत, बिड कॅपॅसिटी आणि पात्रता पाहूनच कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहेत', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.

### शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ५ हजार कोटी जमा

मुंबई (स. गांवकरी) : राज्य सरकारच्या महत्वकांक्षी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून तब्बल ९४ हजार आयकरदाते शेतकरी अपात्र ठरले आहेत. तर या योजनेतील उर्वरित १६ लाख ९४ हजार पात्र शेतकऱ्यांपैकी ६ लाख २२हजार शेतकऱ्यांच्या पीक कर्ज खात्यात आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ५ हजार २८ कोटी रुपये एकाचवेळी जमा करण्यात आली. त्यानंतर या शेतकऱ्यांना बँकांनी त्वरित नव्याने पीक कर्ज द्यावे असे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेचा आढावा घेतला. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे सहकार आयुक्त दीपक तावरे आदी उपस्थित होते.

### ईटी-आयव्हीएफ तंत्रज्ञानाला मोठे यश

मुंबई (स. गांवकरी) : अत्याधुनिक भ्रूण हस्तांतरण व आयव्हीएफ तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुऱ्हा जातीच्या ३ मादी व एन नर, अशा चार निरोगी रेडकांचा यशस्वी जन्म झाला आहे. राज्यातील म्हैस संवर्धन व उच्च आनुवंशिक क्षमतेच्या पशुधन निर्मितीच्या दिशेने हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. हे तंत्रज्ञान राज्यातील दुग्ध उत्पादन क्षेत्रात नव्या क्रांतीची नांदी ठरणार आहे.

# "मला रणनीतिकार किंवा सर्व्हेची गरज नाही"

## सुनील तटकरेंचं वक्तव्य चर्चेत, राष्ट्रवादीत नेमकं काय घडतंय?







मुंबई : (स. गांवकरी)

राजकीय रणनीतिकार प्रशांत किशोर यांची राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आल्याच्या चर्चा आहेत. खासदार पार्थ पवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची प्रशांत किशोर यांच्याबरोबर गुरुवारी एक महत्वाची बैठक झाल्याचं बोललं जात आहे. पण या बैठकीबाबत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षातील नेते अनभिज्ञ असल्याची चर्चा आहे.

प्रशांत किशोर यांची राष्ट्रवादीचे सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे की नाही? याबाबत बोलताना सुनील तटकरे यांनी आपल्याला माहिती नसल्याचं म्हटलं आहे. प्रशांत किशोर यांच्याबाबत आणि राष्ट्रवादीतील घडामोडींवर बोलताना खासदार सुनील तटकरे यांनी एक मोठं वक्तव्य केलं आहे. 'मला रणनीतिकार किंवा सर्व्हेची गरज नाही', असं सुनील तटकरे यांनी आज (७ ऑगस्ट) झालेल्या पत्रकार परिषदेत म्हटलं आहे. त्यांच्या या वक्तव्याचा नेमकं अर्थ काय? त्यांचा रोख नेमकं कोणाकडे? याबाबत आता तर्कवितर्क लावले जात आहेत. "आम्ही सर्वजण फिल्डवर काम करणारे आहोत, मी माझ्या आयुष्यात कधी निवडणुकीचा सर्व्हे केलेला नाही. लोकसभेच्या निवडणुकीवेळी मतमोजणीच्या दिवशी रायगड लोकसभा मतदारसंघ हारणार असं अनेकजण सांगत होते. मला काही रणनीतिकार, सर्व्हेची गरज नाही. मी फिल्डवर काम करणारा माणूस आहे. फिल्डवरवर काम करत असल्यामुळे आपल्याला काय वाटतं याचा अनुभव आहे", असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

"एखाद्या गावात गेल्यानंतर तेथे लोक भेटल्यावर त्यांना काय वाटतं? तरुणांना भेटल्यावर त्यांना काय वाटतं? याचे सगळे अनुभव येतात. शरद पवार आणि अजित पवार या नेत्यांच्या नेतृत्वाखाली आम्ही काम केलेलं आहे. मी महाराष्ट्र आठ वेळा पालथा घातलाय. चांदा ते बांदा मी सांगू शकतो. त्यामुळे मला त्याची चिंता नाही. मला रणनितीकार किंवा सर्व्हेची गरज नाही, हे मी माझ्या स्वत:चं सांगत आहे", असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

"ते आता राजकीय रणनीतिकार जे आहेत, त्यांनी त्यांचं एक वेगळं वैशिष्ट्ये जपलं आहे. ते आमच्या पक्षासाठी काम करतात की नाही? हे मला ज्ञात नाही. सुनेत्रा पवार यांची आणि प्रशांत किशोर यांची भेट झाली आहे. एक ते दीड महिन्यांपूर्वी त्यांची आणि आमची एकत्रितपणे भेट झाली होती. त्यामुळे हा भाग वेगळा झाला. मात्र, आम्ही आमच्या पक्षाचं संघटन राज्यात उभं करत असताना आम्ही सर्वजण नेहमी फिल्डवरवर काम करत असल्यामुळे जनतेला, तरुणांना, शेतकऱ्यांना, उद्योजकांना नेमकं काय हवंय? याचा आम्हाला अनुभव आहे. आम्ही त्या पद्धतीने पक्षाची बांधणी करत आहोत", असं सुनील तटकरे यांनी म्हटलं.

"सुनेत्रा पवार आणि प्रशांत किशोर यांची केवळ सदिच्छा भेट झाली, म्हणजे लगेच त्यांना राष्ट्रवादीचा सल्लागार म्हणून नेमलं असा अर्थ काढणं चुकीचं आहे. ६ ते ७ तास भेट झाली, असं तुम्ही म्हणत आहात. तसेच त्या बैठकीत खासदार पार्थ पवार हे देखील होते, असं मी माध्यमांमधून ऐकलं. त्यामुळे याबाबत पार्थ पवारच स्पष्टपणे सांगू शकतील. मला असं वाटतंय की फक्त भेट झाली म्हणून लगेच पक्षाच्या रणनीतिकार म्हणून त्यांना नेमलं असं होत नाही. आम्ही भारतीय जनता पक्षाबरोबर एनडीएमध्ये काम करत आहोत आणि काम करत राहणार", असं सुनील तटकरे यांनी म्हटलं आहे.

# अहिल्यानगरच्या मतदार यादीत १ लाख ४० हजार ७६६ मृतांची नावे

## ६१ हजार दुबार नावे, 'एसआयआर'चे काम लवकरच पूर्णत्वाकडे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

जिल्ह्यात सुरू असलेल्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण मोहिमेमध्ये (एसआयआर) आत्तापर्यंत असंकलित मतदारांची संख्या ४ लाख २६ हजार ११३ आढळली आहे. त्यामध्ये १ लाख ४० हजार ७६७ मतदार मयत, ६० हजार ८४१ मतदारांची नावे दुबार तर उर्वरित २ लाखावर मतदार हे कायमस्वरूपी स्थलांतरित झालेली आहेत किंवा त्यांचा बीएलओ व त्यांना मदत करणाऱ्या राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांना शोध लागलेला नाही.

अशा असंकलित मतदारांचे एकूण मतदारांशी असलेले प्रमाण १२.१८ टक्के इतके आहे तर नगर शहरात हेच प्रमाण जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजे २२ टक्के आहे. सर्वात कमी अकोल्यामध्ये ५.९३ टक्के प्रमाण असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाढे यांनी दिली. जिल्ह्यात एकूण १२ विधानसभा मतदारसंघ आहेत. त्यापैकी नगर शहर, कर्जत -जामखेड, श्रीरामपूर, शिर्डी व कोपरगाव या पाच मतदारसंघाचे 'एसआयआर'चे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे, उर्वरित मतदारसंघांचे देखील ९८ टक्के पेक्षा अधिक काम पूर्ण झाले असून लवकरच अहिल्यानगर जिल्ह्याचे शंभर टक्के काम पूर्ण होईल असा विश्वास गाढे



यांनी व्यक्त केला. दरम्यान 'एसआयआर' मोहिमेला निवडणूक आयोगाने दुसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या मार्गदर्शनाखाली 'एसआयआर'चे काम जिल्ह्यात सुरू आहे.

जिल्ह्यात एकूण ३८ लाख १० हजार १०२ मतदार आहेत. त्यापैकी असंकलित मतदार संख्या ४ लाख २६ हजार ११३ इतकी आहे. अशा संकलित मतदारांची यादी प्रत्येक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे देण्यात आली आहे. तसेच राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय सहाय्यकांनाही (बीएलए) त्या देण्यात आल्या आहेत. या याद्यांसंदर्भात राजकीय पक्षाच्या सहाय्यकांबरोबर बैठका घेण्याच्या सूचनाही बीएलओ यांना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राचे डिजिटायझेशनचे काम शंभर टक्के पूर्ण झाल्यानंतर मयत, दुबार, कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांच्या याद्या स्थानिक स्तरावर, तालुका पातळीवर व जिल्हा स्तरावरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

# पिशवी बंद दूध २ रुपयांनी, दुग्धजन्य पदार्थ दहा टक्क्यांनी महागणार

मुंबई : (स. गांवकरी)

इंधनाच्या दरात वाढ झाल्यामुळे वाढलेला वाहतूक खर्च, वेष्टनासाठीच्या (पॅकिंग) कच्चा मालाच्या दरात वाढ होऊन वाढलेला वेष्टन खर्च आणि साखरेच्या दरात वाढ झाल्यामुळे गाई आणि म्हशीच्या पिशवी बंद दुधाच्या दरात दोन रुपयांनी तर दुग्धजन्य पदार्थांच्या दरात दहा टक्क्यांनी वाढ करण्याचा निर्णय राज्यातील प्रमुख खासगी, सहकारी दूध संघांनी घेतला आहे, ही दरवाढ मंगळवारपासून (११ ऑगस्ट) लागू होणार आहे. राज्यातील प्रमुख खासगी आणि सहकारी दूध संघांचा समावेश असलेल्या दूध उत्पादक व प्रक्रिया कल्याणकारी संघाच्या सभासदांची बैठक शुक्रवारी पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ

**मंगळवारपासून लागू होणार नवे दर**

मर्यादित, कात्रज डेअरी येथे संघाचे अध्यक्ष गोपाळराव म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत दरवाढीचा निर्णय घेण्यात आला.



मागील काही दिवसांमध्ये डिझेल इंधनाच्या दरात प्रति लिटर १० रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे वाहतूक खर्चात वाढ झाली आहे. आखाती युद्धामुळे वेष्टनासाठीच्या (पॅकिंग) कच्च्या मालाच्या दरात ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रक्रिया जन्य पदार्थांसाठी आवश्यक असलेल्या साखरेच्या दरातही प्रति किलो १२ रुपयांनी वाढ झाली आहे.

# दूरस्थ अभ्यासक्रमाद्वारे पदवी घेणाऱ्यांनाही एक वर्षाचाच पदव्युत्तर अभ्यासक्रम



### परिपत्रकातील मुद्दे

- ज्या उच्च शिक्षण संस्थांना २ वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम ओडीएल किंवा ऑनलाईन पद्धतीने चालवण्याची मान्यता आहे, त्या आता राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या चौकटीनुसार १ वर्षाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करू शकतात.
- ज्या विद्यार्थ्यांनी चार वर्षाचा पदवी अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला आहे, त्यांनाच या एक वर्षाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमात प्रवेश मिळेल.
- दूरस्थ व ऑनलाईन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाही आता अन्य विद्यार्थ्यांप्रमाणेच २०२०चे सर्व शैक्षणिक फायदे मिळतील.

मुंबई : (स. गांवकरी)

दूरस्थ पद्धतीने चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करणे बंधनकारक होते. अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे दूरस्थ विद्यार्थ्यांसाठी १ वर्षाचाच अभ्यासक्रम असावा अशी मागणी शिवसेना (ठाकरे) खासदार अनिल देसाई यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) केली होती. ही मागणी यूजीसीने मान्य केली असून अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे प्रत्यक्ष महाविद्यालयात न जाता दूरस्थ पद्धतीने विद्यापीठातून ४ वर्षांचा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही एक वर्षात आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता येणार आहे.

दिल्ली विद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ ओपन लर्निंग' मध्ये दूरस्थ पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चार वर्षांची पदवी पूर्ण करूनही १ वर्षाच्या एम.ए. अभ्यासक्रमात प्रवेश नाकारला जात होता. महाविद्यालयांत शिक्षण घेऊन पदवी मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना एक वर्षाच्या एम.ए. चा पर्याय उपलब्ध असताना दूरस्थ शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र दोन वर्षांच्या जुन्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यास भाग पाडले जात होते. यामुळे महाराष्ट्र व इतर राज्यांतील हजारो विद्यार्थ्यांवर शैक्षणिक व आर्थिक अन्याय होत होता. या गंभीर बाबीकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना खासदार अनिल देसाई यांनी युजीसीचे अध्यक्ष व शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाचे सचिव डॉ. विनीत जोशी यांना तातडीने पत्र लिहून नियमावलीत सुधारणा करण्याची मागणी केली होती. यूजीसीने ही मागणी मान्य केली. यूजीसीचे सचिव प्रा. श्यामा रथ यांनी २४ जुलै २०२६ रोजी परिपत्रक जाहीर करत सर्व विद्यापीठे व शिक्षण संस्थांना मुक्त, दूरस्थ आणि ऑनलाईन प्रणालीद्वारे एक वर्षाचाच पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणातील एक वर्ष वाचणार असून पुण्या-मुंबईत एल.एल.बी. किंवा इतर व्यावसायिक शिक्षण घेत असताना दूरस्थ पद्धतीने पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# कामगार विभागात निविदा घोटाळा, चार अधिकारी निलंबित

मुंबई : (स. गांवकरी)



खासगी सुरक्षारक्षकांच्या आरोग्य तपासणीसाठी काढण्यात आलेली ५० कोटींची निविंदा पाच वर्षांपर्यंत वाढवून ती २५० कोटींपर्यंत नेण्यासाठी कागदपत्रांमध्ये फेरफार केल्याप्रकरणी कामगार विभागातील चार अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. यामध्ये उपायुक्त अशोक डोके यांचाही समावेश असून कामगार विभागाच्या प्रधान सचिव आय. ए. कुंदन यांच्याकडे ही चौकशी सुरू आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठीचा प्रस्ताव कामगारमंत्री आकाश फुंडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंजुरीसाठी पाठवला आहे.

कामगार विभागाच्या अखत्यारीतील सुरक्षा रक्षक मंडळाकडे नोंदणीकृत असलेल्या खासगी सुरक्षारक्षकांच्या आरोग्य तपासणीसाठी ही निविदा काढण्यात आली होती. निविदेचा मूळ कालावधी एक वर्षाचा होता आणि त्यासाठी सुमारे ५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. मात्र, निविदेशी संबंधित फाइलमधील कागदपत्रांमध्ये फेरफार करून निविदेचा कालावधी पाच वर्षांचा करून कंत्राटदाराला फायदा मिळवून देण्याचा प्रयत्न झाल्याची बाब उघड झाली. कालावधी पाच वर्षे केल्यास निविदेची एकूण किंमत सुमारे २५० कोटी रुपयांपर्यंत जाणार होती. आर्थिक लाभासाठी कागदपत्रांमध्ये हा फेरफार करण्यात आल्याचा प्राथमिक संशय कामगार विभागातील अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी तत्काळ कारवाई करीत उपकामगार आयुक्त अशोक डोके, सहायक कामगार आयुक्त गौतम नलिंदे, मंत्रालयातील कामगार विभागाचे अवर सचिव दिलीप वानिरे आणि विभागातील संतोष पाटील यांना निलंबित करण्यात आले आहे. निलंबित करण्यात आलेले उपकामगार आयुक्त अशोक डोके हे महिनाभरापूर्वी पदावरून निवृत्त झाले आहेत. त्यांच्यावरील चौकशी पूर्ण होईपर्यंत निवृत्तीनंतरचे लाभही रोखण्यात आले आहेत. निविदेतील कागदपत्रांमध्ये फेरफार झाल्याची बाब कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी तातडीने विभागाच्या सचिवांना संबंधित अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानंतर चौघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. या प्रकरणात संबंधित अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री हे सामान्य प्रशासन विभागाचेही प्रमुख असल्याने या प्रकरणातील पुढील कारवाईसाठी त्यांची मंजुरी आवश्यक आहे.

# पुणे विमानतळावरील विमान उड्डाणांना अडथळा

पुणे : (स. गांवकरी)

'लोहगाव येथील पुणे विमानतळावरून नागरी आणि हवाई दलाच्या लष्करी विमानांच्या सुरक्षित उड्डाणांना घार आणि अन्य पक्ष्यांचा अडथळा होत आहे. विमानतळाच्या आजूबाजूला उघड्यावर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याकडे पक्षी, श्वान आकर्षित होत असून, विमानांचे उड्डाण, उतरण्याच्या मार्गात ते त्रासदायक अडथळा ठरत आहेत,' असे निरीक्षण हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी नोंदवले. त्यामुळे विमानतळावरील धावपट्टीच्या परिसरात मानवी गस्तीसह विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. हवाई दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले, 'लोहगाव येथे हवाई दलाचा तळ आहे. तसेच, या विमानतळावरून नागरी विमानसेवाही मोठ्या प्रमाणात चालते. विमानतळावरून दररोज सरासरी २४० नागरी उड्डाणे होतात, तर वर्षाला सुमारे ७२ हजार उड्डाणांची नोंद होते. पुण्यात साधारणपणे २०० जातींचे पक्षी आढळतात; त्यांपैकी सुमारे २० प्रजाती विमानांच्या उड्डाण क्षेत्रात नियमितपणे दिसून येतात. या सर्व पक्ष्यांमध्ये आकाराने मोठी असलेली आणि उंचावर घिरट्या घालणारी घार सर्वाधिक त्रासदायक



आहे. देशभरात २०२० ते जून २०२५ या कालावधीत ५ हजार ७४० पक्षिधडकेच्या घटना नोंदविण्यात आल्या आहेत. या घटनांमध्ये ८०४ विमानांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे पक्षिधडकेचा प्रश्न हा विमान सुरक्षेपुढील गंभीर आव्हान ठरत आहे.' 'विमानतळाच्या परिसरात स्वच्छता असणे आवश्यक आहे. मात्र, उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याच्या ढिगांकडे पक्षी आकर्षित होतात.

तसेच, भटके श्वानही मोठ्या प्रमाणात येतात. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यात पक्ष्यांना पांगवण्यासाठी विशेष पथक, मोठा आवाज निर्माण करणाऱ्या उपकरणांचा (हाय डेसिबल झोन गन) वापर, पक्ष्यांचा अधिवास कमी करण्यासाठी धावपट्टीजवळील गवताची छाटणी, धावपट्टी आणि विमानतळ परिसरात सातत्याने गस्त घालणे अशा उपाययोजनांचा त्यात समावेश आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## 'शिवरत्न' नावावरून पुन्हा चर्चेत मोहिते-पाटील घराणे

सोलापूर (स. गांवकरी) : सोलापूर जिल्हा परिषदेच्या राजकारणात अनेक वर्षे प्रभावी राहिलेल्या मोहिते-पाटील घराण्याशी जोडल्या गेलेल्या 'शिवरत्न' या नावाची पुन्हा एकदा जोरदार चर्चा सुरू झाली आहे. जिल्हा परिषदेतील सभागृहाचे 'शिवरत्न' हे नाव बदलण्याचा निर्णय झाल्यानंतर या नावामागील इतिहास, मोहिते-पाटील घराण्याचे योगदान आणि बदलत्या राजकीय समीकरणांकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. 'शिवरत्न' हे नाव केवळ एका सभागृहापुरते मर्यादित नव्हते. अकलूज परिसरातील मोहिते-पाटील घराण्याच्या अनेक शैक्षणिक, सामाजिक आणि सहकारी संस्थांमध्ये हे नाव गेल्या अनेक दशकांपासून वापरले जात आहे. त्यामुळे या नावाला घराण्याच्या राजकीय आणि सामाजिक प्रवासाचे प्रतीक मानले जाते. जिल्हा परिषदेत मोहिते-पाटील गटाचे अनेक वर्षे वर्चस्व होते. त्या काळात विविध विकासकामांसह काही महत्त्वाच्या वास्तूंना आणि सभागृहांना विशिष्ट ओळख देण्यात आली. त्याच काळात जिल्हा परिषदेतील मुख्य सभागृहाला 'शिवरत्न' हे नाव देण्यात आले होते. या नावामागे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या आई-वडिलांच्या नावातील आद्यक्षरांचा संदर्भ असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीने हे नाव बदलून माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या नावाने सभागृहाचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. हा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर 'शिवरत्न' या नावाची जिल्हा परिषदेतील अधिकृत ओळख संपुष्टात येणार आहे. राजकीय निरीक्षकांच्या मते, हा निर्णय केवळ नामांतरापुरता मर्यादित नसून सोलापूरच्या बदलत्या राजकीय समीकरणांचे प्रतीक मानला जात आहे. गेल्या काही वर्षांत जिल्ह्यातील राजकीय नेतृत्वात झालेल्या बदलांनंतर मोहिते-पाटील घराण्याच्या प्रभावाशी संबंधित अनेक मुद्दे चर्चेत आले आहेत. त्यात आता 'शिवरत्न' सभागृहाच्या नामांतराची भर पडली आहे.

## दारू पिवुन मोटारसायकल चालवणाऱ्या इसमास दहा हजार रूपयांचा दंड

ओतूर (स. गांवकरी) : दिनांक ०६/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०७:०० वा.च्या सुमारास ओतूर शहरातील बाजारपेठेत इसम नामे लहु बबन कोळपे वय-२८ वर्षे रा. वनकुटे ता. संगमनेर जि. अहील्यानगर हा त्याच्या ताब्यातील युनिकॉर्न मोटारसायकल नं. एम.एच. १६ डी.जे. ०९२७ ही दारू पिवुन चालवत असताना मिळुन आल्याने त्याच्या विरूध्द ओतूर पोलीस स्टेशनला दिनांक ०६/०८/२०२६ रोजी २१:२५ वा. गु.र.नं. २०६/२०२६ मो. वा. कायदा कलम १८५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. दाखल गुन्हयाचा पुढील तपास हा पो.हवा. नामदेव बांबळे यांच्याकडे देण्यात आला होता. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी लहु बबन कोळपे वय २८ वर्षे रा. वनकुटे ता. संगमनेर जि. अहील्यानगर यास नमुद गुन्हयात मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. जुन्नर यांचे समोर हजर केले असता मा. न्यायालयाने सदरच्या इसमास १०,००० रू दंडाची शिक्षा ठोठावली आली आहे. सदरची कारवाई मा. संदिपसिंह गिल, पोलीस अधीक्षक सो. पुणे ग्रामीण, मा. शुभम कुमार, अप्पर पोलीस अधीक्षक सो. पुणे, मा. धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी सो. जुन्नर विभाग जुन्नर यांचे मार्गदर्शनाखाली ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि श्री. ज्ञानेश्वर बाजगीरे, पो.हवा नामदेव बांबळे, महीला पोलीस कर्मचारी संगीता दिघे, पोलीस कर्मचारी अतुल भेके, आशिष जगताप यांनी केली आहे. सदरच्या कारवाईमुळे दारू पिवून बाजारपेठोत वाहन चालवणाऱ्या चालकांवर वचक बसणार असुन यापुढे सुध्दा दारू पिवून वाहन चालवताना मिळुन आल्यास त्यांच्या विरूध्द अशाच प्रकारे कायदेशिर कारवाई सुरू ठेवली जाणार असल्याचे ओतूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी ज्ञानेश्वर बाजगीरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले आहे.

## पुष्पावती विद्यालयात शिक्षक-पालक सहविचार सभा उत्साहात संपन्न

ओतूर (स. गांवकरी) : ग्रामविकास मंडळ, ओतूर संचलित पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथे शिक्षक-पालक सहविचार सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व पालक यांच्यात सुसंवाद निर्माण व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या सभेत शालेय प्रगतीचा आढावा, बदललेला अभ्यासक्रम, विद्यालयात राबविण्यात येणारे विविध शैक्षणिक उपक्रम, विद्यार्थी शिस्त, पालकांची जबाबदारी तसेच विद्यार्थी गुणवत्ता वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सभेत पालक प्रतिनिधी म्हणून उपसरपंच राजेंद्र उकिरडे, निलोफर पठाण आणि समीर लोहोटे यांनी विद्यालयाच्या शैक्षणिक व संस्कारक्षम उपक्रमांचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. उपस्थित पालकांनी विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने विविध विधायक सूचना मांडल्या. विद्यालयाचे मुख्याध्यापक शरद माळवे यांनी मनोगतात पालकांच्या शंकांचे निरसन करताना, "मुलांना संपत्तीपेक्षा संस्कार द्या; संपत्ती संपते, पण संस्कार आयुष्यभर साथ देतात," असा मोलाचा संदेश दिला. शाळा आणि घर यांच्यातील समन्वय जितका अधिक दृढ असेल, तितके विद्यार्थ्यांचे यश अधिक उंचावेल, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थी केवळ गुणांनी नव्हे तर संस्कार, चारित्र्य आणि उत्तम नागरिकत्वाच्या मूल्यांनी घडण्यासाठी पालकांनी विद्यालयाच्या उपक्रमांना सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.




## आयुष्मान भारत योजनेत दाखल होणारे रुग्ण उपचारांपासून वंचित राहू नये

नाशिक (स. गांवकरी) : एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना ही अतिशय चांगली योजना आहे. या योजनेत आता पॅकेजेस वाढविले आहेत. या योजनेंतर्गत उपचारासाठी दाखल रुग्ण उपचारापासून वंचित राहू नये, असे निर्देश आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात शुक्रवारी सकाळी एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री व महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेचा डॉ. शेटे यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश शिंपी, निवासी उपजिल्हाधिकारी रोहितकुमार राजपूत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नीलेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, योजनेचे समन्वयक डॉ. पंकज दाभाडे, तहसीलदार प्रदीप वर्पे, डॉ. दिनेश बच्छाव उपस्थित होते.

# "सध्याच्या तंत्रज्ञानाच्या युगात आरोग्यविषयक जागरूकता आवश्यक" : अमृता फडणवीस

### डॉ. अजय कोठारी आणि डॉ. अभिनव भुते लिखित 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' पुस्तकाची मराठी व इंग्रजी आवृत्ती प्रकाशित

पुणे : (स. गांवकरी)




"आजच्या तंत्रज्ञान केंद्रित युगात प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा आवश्यक आहेच, पण डिजिटल उपकरणांवरील वाढते अवलंबित्व, एकाच जागी बसून दीर्घकाळ काम करणे, बसण्याची चुकीची पद्धत आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे सध्या पाठीच्या व मानदुखी च्या समस्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे, " असे मत दिविजा फाऊंडेशनच्या संस्थापिका अमृता फडणवीस यांनी मांडले. मणक्याचे आजार या विषयातील ख्यातनाम तज्ज्ञ डॉ. अजय कोठारी आणि डॉ. अभिनव भुते लिखित 'पाठ फिरवा पाठदुखीकडे' या पुस्तकाच्या मराठी आणि इंग्रजी आवृत्तीच्या प्रकाशन सोहळ्याप्रसंगी त्या बोलत होत्या. संचेती रुग्णालयाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. पराग संचेती, उद्योजक सौरभ बोरा, मृणाल पवार, पुस्तकाचे दोन्ही लेखक, रमेश कोठारी आणि वैद्यकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. अमृता फडणवीस पुढे म्हणाल्या की, उपचारांपेक्षा प्रतिबंध अधिक प्रभावी ठरतो, मात्र प्रतिबंधाची सुरुवात जागरूकतेपासून व्हायला हवी. निरोगी व सक्रिय आयुष्यासाठी आपल्या शरीराला समजून घेणे आणि आरोग्याला पूरक अशा जीवनशैलीची निवड करणे अत्यंत आवश्यक आहे. मणक्याच्या सुदृढतेसाठी जनजागृतीसह प्रतिबंधात्मक काळजी घेण्याकरिता हे पुस्तक महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही त्या म्हणाल्या. मृणाल पवार म्हणाल्या, "आजची पिढी तंत्रज्ञानाशी सातत्याने जोडलेली आहे. पण ती स्वतःच्या आरोग्यापासून दूर जात आहे. मणक्याच्या आरोग्याविषयीची चर्चा ही केवळ वेदनांवरील उपचारांपुरती मर्यादित नसून, ती आयुष्यात संतुलन राखणे, जागरूकता निर्माण करणे आणि एकूण जीवनमान सुधारण्याशी संबंधित आहे. या पुस्तकाच्या माध्यमातून दोन दिग्गज डॉक्टरांचे ज्ञान आणि तब्बल दोन दशकांचा वैद्यकीय अनुभव वाचकांसाठी सोप्या भाषेत उपलब्ध करून देण्यात आला आहे." सार्वजनिक आरोग्य क्षेत्रापुढील नव्या आव्हानांवर प्रकाश टाकताना डॉ. अजय कोठारी यांनी सांगितले की, मानदुखी व पाठीची दुखणी आता केवळ ज्येष्ठांपुरती मर्यादित राहिलेली नाहीत. स्क्रीनचा जास्त वापर, मैदानी हालचालींचा अभाव, व्यायामाची कमतरता, चुकीच्या पद्धतीने बसणे आणि अयोग्य जीवनशैली यामुळे तरुण वर्गात या आजारांचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे, ही चिंतेची बाब आहे. समस्या गंभीर होण्यापूर्वी लोकांनी ती समजून घ्यावी आणि साध्या प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करावे, या उद्देशाने आम्ही हे पुस्तक लिहिले आहे. मुख्य भाषणात डॉ. पराग संचेती यांनी आधुनिक जीवनशैलीमुळे शारीरिक हालचाली अत्यंत कमी झाल्याचे सांगत, सुरुवातीच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करण्याचे आणि वेळेवर निदान व उपचारांसाठी नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले. निरोगी शरीरासाठी शिस्त, नियमित व्यायाम, शरीराचे योग्य वजन राखणे, पुरेशी विश्रांती आणि मानसिक शांती या पाच मूलभूत सूत्रांचा उल्लेख डॉ. संचेती यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूषण करंदीकर यांनी केले, तर डॉ. डिंपल कोठारी यांनी आभार मानले.

## टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडचा आयपीओ ७ ऑगस्ट २०२६ पासून खुला

पुणे : (स. गांवकरी)

कंपनी टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडने जाहीर केले की, या कंपनीचा प्रारंभिक समभाग विक्री प्रस्ताव (आयपीओ) शुक्रवार,७ ऑगस्ट पासून सबस्क्रिप्शनसाठी खुला होणार आहे. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली लावण्याची तारीख गुरुवार,६ ऑगस्ट असून, हा इश्यू मंगळवार,११ ऑगस्ट २०२६ रोजी बंद होणार आहे. कंपनीला या इश्यूमधून प्राइस बँडच्या कमाल रु.२५१.८८ कोटी निधी उभारण्याची अपेक्षा असून, बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध होण्याचा कंपनीचा मानस आहे. या इश्यूसाठी प्रति शेअर रु.२०० ते रु.२१२ असा प्राइस बँड निश्चित करण्यात आला आहे. किमान ७० इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ७० च्या पटीत बोली लावता येणार आहे. खंबाटा सिक्युरिटीज लिमिटेड ही या इश्यूची बुक रनिंग लीड मॅनेजर असून, बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ही रजिस्ट्रार म्हणून काम पाहणार आहे. या आयपीओमध्ये ९,५०५,००० इक्विटी शेअर्सचा फ्रेश इश्यू आणि कार्तिकेय कन्स्ट्रक्शन्स (पार्टनरशिप फर्म) या प्रमोटर सेलिंग समभागधारकांच्या २,३७६,००० शेअर्सपर्यंत इक्विटीची ऑफर फॉर सेल यांचा समावेश आहे. प्रत्येकी रु.१० दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सचा हा इश्यू बुक-बिल्डिंग पद्धतीद्वारे सादर करण्यात येत आहे.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये टेक्नोक्राफ्ट व्हेंचर्स लिमिटेडने कामकाजातून रु.३४४.९९ कोटी महसूल नोंदवला असून, करानंतरचा नफा (पीएटी) रु.४३.३२ कोटी इतका होता. आर्थिक वर्ष २०२४-२५मध्ये कंपनीने कामकाजातून रु.२७९.५६ कोटी महसूल आणि रु.२८.२० कोटी करानंतरचा नफा (पीएटी) नोंदवला होता.

# कल्याण ग्रामीणमध्ये काँग्रेसच्या कामाला वेग

### तालुकाध्यक्ष केतन पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सर्वपक्षीय नेत्यांची उपस्थिती!






कल्याण : (स. गांवकरी)

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नवनिर्वाचित कल्याण ग्रामीण तालुकाध्यक्ष केतन गुलाब पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रायते येथे उत्साहात कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, महाविकास आघाडीचे पदाधिकारी, विविध राजकीय पक्षांचे नेते तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे जिल्हा काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह पवार हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन काँग्रेस आदिवासी सेलचे सरचिटणीस रवीश तांडेल, ठाणे जिल्हा काँग्रेसचे कोषाध्यक्ष अमोल सुरोशी तसेच पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले. सामाजिक कार्यकर्ते भरत दळवी यांनीही आपल्या मंचच्या माध्यमातून केतन पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या आगामी राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नव्या जबाबदारीनंतर केतन पवार यांनी कल्याण ग्रामीणमध्ये पक्षसंघटना मजबूत करण्यासाठी जोमाने कामाला सुरुवात केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास उदय पाटील (कुणबी प्रतिष्ठान), नरेश सुरोशी (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे), बाळाराम कोर (राष्ट्रवादी काँग्रेस – अजित पवार गट), अनिल चिराटे (मुरबाड तालुका काँग्रेस), प्रितम शर्मा, रमेश बांगर, चंद्रकांत मोहपे, संतोष सुरोशी, भगवान कोर, सुनील पाटील, अनिल धुमाळ, उत्तम शिरोशे, यशवंत राऊत, विलास जाधव, संजय जाधव, भरत घनघाव, गणेश चौधरी, श्याम मिरकुटे, राजेश सुरोशी, किरण केणे, जफर मुंडे, तुषार देसले, रविंद्र भोईर, नवनाथ मिरकुटे, रविंद्र बासरे, मयुर सुरोशी, दिनेश कोर, अनंत गायकर, भरत विशे, निलेश पवार, रमेश जाधव, सुनील शिर्के, अशोक आयरेकर, अविनाश चंदने, मोनिश चंदने तसेच अनेक मान्यवर, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एजेंटिक स्केलला चालना : अॅडेसोचा पुणे आणि चेन्नईमध्ये विस्तार

पुणे : (स. गांवकरी)




युरोपमधील आघाडीच्या माहिती-तंत्रज्ञान सेवा आणि सॉफ्टवेअर विकास क्षेत्रातील कंपनी अॅडेसो (adesso) ने पुणे आणि चेन्नई येथे आपल्या भारतीय कामकाजाचा धोरणात्मक विस्तार जाहीर केला आहे. 'एजेंटिक स्केल' या उपक्रमाअंतर्गत हा विस्तार करण्यात येत असून, जागतिक उद्योगांना डिजिटल क्षमता, बुद्धिमान स्वयंचलन आणि आधुनिक सॉफ्टवेअर विकासासाठी नवे तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्याचा कंपनीचा उद्देश आहे.

जागतिक स्तरावर पारंपरिक खर्चकपात-आधारित परदेशी कामकाजाच्या पद्धतीऐवजी जागतिक क्षमता केंद्रे (ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्स – जीसीसी) उभारण्याकडे उद्योगांचा कल वाढत आहे. या केंद्रांमधून संयुक्त नवोन्मेष, दुहेरी वितरण प्रणाली आणि संपूर्ण सॉफ्टवेअर विकास प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित (एजेंटिक एआय) तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. पुणे आणि चेन्नई येथील नव्या केंद्रांमुळे पुण्यातील उत्पादन अभियांत्रिकीतील कौशल्य आणि चेन्नईतील उद्योगांसाठी डेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्लाऊड आधुनिकीकरणातील क्षमता एकत्र आणली जाणार आहे. कोची येथील विद्यमान केंद्रासह देशभरात अत्याधुनिक तंत्रज्ञानातील कुशल मनुष्यबळाची साखळी उभारण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. अॅडेसो एसईचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क लोहवेबर म्हणाले, "भारतातील आमची कंपनी ही 'जागतिक विचार, स्थानिक कार्य' या धोरणाचे उत्तम उदाहरण आहे. पुणे आणि चेन्नई येथील नव्या नवोन्मेष केंद्रांमधून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा क्षेत्रातील कौशल्य अधिक बळकट करून जागतिक ग्राहकांना स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम सेवा पुरविण्यात येतील."जागतिक वितरण क्षमता अधिक प्रभावी करण्यासाठी अॅडेसो इंडिया कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित विकास चौकट आणि स्वयंचलित सॉफ्टवेअर प्रणालींचा वापर करत आहे. तर धोरण, व्यवस्थापन आणि गुणवत्ता हमी यांसारख्या महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मानवी तज्ज्ञांकडेच राहणार आहेत. अॅडस्केल आणि स्मार्टशोअर एआय-आधारित जागतिक क्षमता केंद्र (SaGE) या कार्यपद्धतींच्या माध्यमातून उच्चस्तरीय सुरक्षा, डेटा संरक्षण आणि जलद सेवा पुरविण्यावर भर दिला जात आहे. चेन्नई येथील वितरण मॉडेलचे यश आधीच सिद्ध झाले आहे. २०२५ पासून अॅडेसो एक्सासोल टेक हबचे संपूर्ण कामकाज सांभाळत असून, अवघ्या पाच महिन्यांत या केंद्राची क्षमता दुप्पट करण्यात आली आहे.

अॅडेसो इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक प्रमोद मुरलीधरन म्हणाले, "पुणे आणि चेन्नई येथील कार्यालयांचे उद्घाटन हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आणि स्वयंचलित उद्योगव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करताना भारतातील आमची उपस्थिती अधिक मजबूत करण्यासाठी आम्ही कुशल मनुष्यबळ, तंत्रज्ञान क्षमता आणि नवोन्मेष व्यवस्थेत मोठी गुंतवणूक करत आहोत.

ही केंद्रे उत्कृष्टता केंद्र म्हणून कार्य करून जागतिक ग्राहकांसाठी नाविन्यपूर्ण उपाय आणि दीर्घकालीन मूल्य निर्माण करतील." कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित बहु-एजंट प्रणाली आणि मानवी तज्ज्ञतेची सांगड घालत अॅडेसो जागतिक उद्योगांना अधिक वेगवान, सुरक्षित आणि परिणामकारक डिजिटल परिवर्तन साध्य करण्यास मदत करणार असल्याचे कंपनीने स्पष्ट केले आहे.

## परराज्यातील कांद्याच्या गोण्या कळवण-आभोणा रस्त्यावर

कळवण : (स. गांवकरी)

देवळा तालुक्यात परराज्यातील कांद्याच्या साठवणुकीबाबत संशयपदबाबी निर्माण झाल्यानंतर आता थेट कळवण तालुक्यातही अशाच प्रकारची चर्चा सुरू झाली आहे. कळवण-आभोणा मुख्य रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात परराज्यातील कांद्याच्या गोण्या पडून आढळल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये विविध शंका उपस्थित होत आहेत.स्थानिक शेतकरी आणि नागरिकांचे म्हणणे आहे की,या गोण्या नेमक्या कोणाच्या आहेत, त्या कुठून आणल्या गेल्या आणि त्यांचा उपयोग कशासाठी केला जाणार आहे,याची तातडीने चौकशी व्हावी.काही शेतकऱ्यांनी असा संशय व्यक्त केला आहे की, परराज्यातील कांदा रात्रीच्या वेळी कळवण तालुक्यातील नांदेडच्या गोदामांमध्ये साठवला जात आहे का, याची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे.विशेष म्हणजे, कळवण तालुक्यातील नाफेडच्या गोदामांमध्ये कांद्याचा साठा करण्यात येत



- नाफेडच्या गोदामांची चौकशी करण्याची शेतकऱ्यांची मागणी

असल्याच्या चर्चेमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. त्यामुळे संबंधित यंत्रणांनी नाफेडच्या गोदामांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

शेतकऱ्यांचा प्रश्न स्पष्ट आहे – महाराष्ट्र हा देशातील प्रमुख कांदा उत्पादक राज्य असताना परराज्यातील कांदा आणण्याची गरज काय? जर स्थानिक शेतकऱ्यांचा कांदा योग्य भावाअभावी पडून असेल आणि दुसरीकडे बाहेरील कांद्याला प्राधान्य दिले जात असेल.

# ३१ लाखांच्या रेशनच्या धान्यासासह ४ आरोपी जेरबंद

सोलापूर : (स. गांवकरी)



बार्शी पोलिसांनी मोठा दणका देत ३१ लाखांच्या रेशनच्या धान्यासासह ४ आरोपी जेबंद केले आहे. गोरगरीबांसाठी शासनाकडून मोफत पुरवण्यात येणाऱ्या रेशन धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांवर बार्शी तालुका पोलिसांनी जोरदार कारवाई केली आहे. एकाच कारवाईत तब्बल १९,३०० किलो तांदूळ, गहू आणि उडीद डाळ जप्त करण्यात आली. या मुद्देमालाची किंमत ३१ लाख १५ हजार ९८१ रुपये आहे. तालुका पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे आणि तहसीलदार बार्शी यांना गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार मौजे फपाळवाडी येथील रेल्वे स्टेशनसमोरील अरणगाव रस्त्यावरील मांगडे यांच्या शेतात असलेल्या पत्रा शेडमध्ये सार्वजनिक वितरण प्रणालीचे धान्य साठवून ट्रक आणि पिकअपमध्ये भरून विक्रीसाठी नेले जात आहे.

महसूल प्रशासन, पुरवठा प्रशासन आणि पोलीस यांच्या संयुक्त पथकाने छापा टाकला. तेथे पोत्यांमध्ये भरलेला तांदूळ, गहू आणि उडीद डाळ वाहनांमध्ये भरत असताना आढळला. पंचनामा करून वाहनांसह सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुरवठा निरीक्षक ज्ञानेश कुंटलवाड यांच्या फिर्यादीवरून बार्शी तालुका पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तू अधिनियम आणि भारतीय न्याय संहिता या कायद्यांखाली चार आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींची नावे पुढीलप्रमाणे: 1. धनाजी अर्जुन मांगडे 2. गजेंद्र अर्जुन मांगडे 3. चांगदेव पिराजी दळवी 4. गणेश श्रीहरी कदम सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून आज त्यांना न्यायालयात पोलीस कस्टडीसाठी हजर करण्यात येणार आहे. गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे करीत आहेत. या प्रकरणात आणखी आरोपींचा समावेश असण्याची शक्यता आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोलापूर ग्रामीण अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप आणि तहसीलदार बार्शी यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक अक्षय सोनवणे, पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के, युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, गोविंद बचूटे आणि पुरवठा निरीक्षक यांचा सहभाग होता. गोरगरीबांच्या हक्काचे धान्य हिरावून घेणाऱ्यांवर पुढील कारवाईही सुरू राहील, असे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे




### महाराष्ट्रातील कुटुंबांसाठी स्टार हेल्थचे आरोग्य विमा जनजागृती अभियान

- ५० हून अधिक शहरे व गावांमध्ये ३० दिवसांचा रोडशो
- आरोग्य संरक्षणासह आर्थिक पूर्वतयारीवर भर

अहिल्यानगर (स. गांवकरी) : वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च आणि अचानक उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक संकटांमुळे कुटुंबांवर येणारा आर्थिक भार लक्षात घेता, स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने महाराष्ट्रात महिनाभराचे आरोग्य विमा जनजागृती अभियान सुरू केले आहे. २२ जुलै ते २० ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेला हा रोडशो राज्यातील ५० हून अधिक शहरे व गावांमधून प्रवास करत आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि पुणे विभागातील विविध भागांतून ही विशेष जनजागृती व्हॅन प्रवास करत असून, कुटुंबे, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, स्वयंरोजगार करणारे नागरिक आणि स्थानिक व्यावसायिक यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधला जात आहे. आरोग्य विमा समजण्यास सोपा करणे, आर्थिक पूर्वतयारीचे महत्त्व पटवून देणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्य सेवांबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. भारतामध्ये आरोग्य विम्याची व्याप्ती वाढत असली, तरी नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी स्वतःच्या खिशातून करावा लागणारा खर्च अद्याप मोठा आहे. भारतातील एकूण आरोग्य खर्चापैकी ४३.४ टक्के खर्च नागरिकांना स्वतःच्या खिशातून करावा लागतो, अशी माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे अनपेक्षित वैद्यकीय खर्चापासून कुटुंबाच्या आर्थिक नियोजनाचे संरक्षण करण्यासाठी पुरेसा आरोग्य विमा असणे आवश्यक असल्याचे कंपनीने म्हटले आहे.

### भारती हेक्साकॉमची दमदार कामगिरी; Q1 मध्ये महसूल 10.9% वाढून 2,510 कोटींवर

गुरुग्राम (स. गांवकरी) : भारती हेक्साकॉम लिमिटेडने (Bharti Hexacom) 30 जून 2026 रोजी संपलेल्या आर्थिक वर्ष 2026-27 च्या पहिल्या तिमाहीचे (Q1'27) ऑडिटेड आर्थिक निकाल जाहीर केले. या तिमाहीत कंपनीचा एकूण महसूल 2,510 कोटी रुपयांवर पोहोचला. हा महसूल गेल्या वर्षीच्या याच तिमाहीच्या तुलनेत 10.9% आणि मागील तिमाहीच्या तुलनेत 4% अधिक आहे. मोबाईल सेवांमधून मिळणाऱ्या महसुलातही वर्षभरात 9.3% वाढ झाली. अधिक ग्राहकांनी चांगल्या प्लॅनची निवड केल्यामुळे आणि विद्यमान ग्राहक कंपनीसोबत कायम राहिल्यामुळे ही वाढ झाली आहे. Q1'27 मध्ये प्रति ग्राहक सरासरी महसूल (ARPU) 259 रुपयांवर पोहोचला. गेल्या वर्षी याच तिमाहीत तो 246 रुपये होता. स्मार्टफोन डेटा वापरणाऱ्या ग्राहकांची संख्या सातत्याने वाढत असून, गेल्या एका वर्षात कंपनीने 13 लाख नवीन स्मार्टफोन डेटा ग्राहक जोडले आहेत. त्यामुळे या ग्राहकवर्गात वार्षिक 6% वाढ झाली आहे. या तिमाहीत मोबाईल डेटा वापर 2,381 पेटाबाइट (PB) इतका झाला, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत 30.5% अधिक आहे. ग्राहकांना अधिक वेगवान आणि चांगला डिजिटल अनुभव देण्यासाठी कंपनीने 5G नेटवर्क स्लायसिंग तंत्रज्ञानावर आधारित 'पोस्टपेड फास्ट लेन' सेवा सुरू केली आहे. तसेच नेटवर्कची गुणवत्ता आणि कव्हरेज वाढवण्यासाठी कंपनीने गेल्या एका वर्षात 399 नवीन टॉवर्स उभारले आहेत. कंपनीच्या होम्स, ऑफिस आणि इतर सेवा विभागानेही चांगली वाढ नोंदवली आहे. या विभागाचा महसूल गेल्या वर्षीच्या तुलनेत 61.4% वाढला आहे. वाय-फाय आणि आयपीटीव्ही सेवांची वाढती मागणी लक्षात घेता मोठ्या प्रमाणावर नवीन ग्राहक जोडले गेले आहेत. या विभागातील ग्राहकांची संख्या आता 9 लाखांवर पोहोचली आहे. कंपनीने आपल्या फायबर नेटवर्कचाही विस्तार केला आहे. आता हे नेटवर्क 121 शहरांमध्ये उपलब्ध असून, गेल्या वर्षी याच काळात ते 115 शहरांमध्ये उपलब्ध होते.

### बर्जर पेंट्स तर्फे पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर

पुणे (स. गांवकरी) : बर्जर पेंट्सच्या आर्थिक वर्ष २०२७ च्या पहिल्या तिमाहीचे निकाल जाहीर करण्यात आले. पश्चिम आशियातील संघर्षांनंतरही महसूल आणि ऑपरेटींग नफ्यात दोन-अंकी वाढ दिसून आली. स्वतंत्र आधारावर २५ टक्क्यांहून अधिक आणि एकत्रित आधारावर २९ टक्क्यांहून अधिक वाढीसह करोत्तर नफ्यामध्ये (पीएटी) प्रबळ वाढ दिसून आली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ऑपरेशन्समधून मिळालेला महसूल ३,५८३.८ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ३,२००.८ कोटी रूपयांच्या तुलनेत १२.० टक्के वाढ झाली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए (इतर उत्पन्न वगळून) ६०७.४ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ५२८.४ कोटी रूपयांच्या तुलनेत १५.० टक्के वाढ झाली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी निव्वळ नफा ४०५.० कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ३१५.० कोटी रूपयांच्या तुलनेत २८.६ टक्के वाढ झाली. ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ऑपरेशन्समधून मिळालेला महसूल ३,२२६.७ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील २,८६२.६ कोटी रूपयांच्या तुलनेत १२.७ टक्के वाढ झाली.३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी ईबीआयटीडीए (इतर उत्पन्न वगळून) ५६२.२ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील ४९९.५ कोटी रूपयांच्या तुलनेत १२.६ टक्के वाढ झाली.३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी निव्वळ नफा ३६८.७ कोटी रूपये होता, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या याच तिमाहीतील २९३.८ कोटी रूपयांच्या तुलनेत २५.५ टक्के वाढ झाली.

### हुमा कुरेशी आणि भूमी पेडणेकर ‘लॉक अप: सच या सज़ा’मध्ये दाखल




मुंबई (स. गांवकरी) : नेटफ्लिक्सवरील जागतिक स्तरावर चर्चेत असलेला कॅप्टिव्ह रिॲलिटी शो ‘लॉक अप: सच या सज़ा’ आता अंतिम टप्प्यात पोहोचला आहे. ग्रँड फिनालेच्या आठवड्यापूर्वी अभिनेत्री हुमा कुरेशी आणि भूमी पेडणेकर यांनी ‘जनता की आवाज’ म्हणून शोमध्ये प्रवेश केला. हाय-स्टेक्स जजमेंट डेच्या निमित्ताने दोघींनी कैद्यांची भेट घेत त्यांना थेट प्रश्न विचारले आणि त्यांच्या गेमप्लेची कसून छाननी केली. फिनाले जवळ येत असताना स्पर्धकांमधील समीकरणे वेगाने बदलत आहेत. अपूर्ण राहिलेल्या स्पर्धा, कैद्यांचा आतापर्यंतचा प्रवास आणि त्यांनी खेळलेला डाव यावर हुमा आणि भूमी यांनी थेट प्रश्न उपस्थित केले. त्यामुळे जजमेंट डे अधिक रंगतदार झाला. कठीण प्रश्न, थेट संवाद आणि अनपेक्षित प्रसंगांमुळे अंतिम टप्प्यातील स्पर्धेची तीव्रता आणखी वाढली. शोमध्ये सहभागी झाल्याबद्दल बोलताना हुमा कुरेशी म्हणाली, “लॉक अप हा खूपच अप्रतिम शो आहे. सध्या हा सर्वात व्हायरल शो आहे. मी तो केवळ नेटफ्लिक्सवरच नाही, तर रील्समधूनही फॉलो करते. माझा इन्स्टाग्राम अल्गोरिदम ‘लॉक अप’ने भरलेला आहे.”

# कर्करोगावरील आयुर्वेदाच्या मूलभूत संशोधनाला मान्यता

पुणे : (स. गांवकरी)



कर्करोगावरील आयुर्वेदाच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाची मान्यता मिळाली आहे. पुण्यातील रसायु कॅन्सर क्लिनिकच्या संशोधनाची निवड अमेरिकन सोसायटी ऑफ क्लिनिकल ऑन्कोलॉजी (एएससीओ-ॲस्को) आयोजित 'ॲस्को ब्रेकथ्रू २०२६' या जागतिक परिषदेत झाली असून, जर्नल ऑफ क्लिनिकल ऑन्कोलॉजी (जेसीओ) 'इम्पॅक्ट फॅक्टर-४४.७' या प्रतिष्ठित वैद्यकीय नियतकालिकातही त्याचा समावेश करण्यात आला आहे. ऑन्कोलॉजी क्षेत्रातील ३३३ नियतकालिकांपैकी सातव्या क्रमांकावर असलेल्या या प्रतिष्ठित नियतकालिकात संशोधन प्रकाशित होणे ही भारतीय आयुर्वेद संशोधनासाठी महत्त्वाची आंतरराष्ट्रीय मान्यता मानली जात आहे. रसायु कॅन्सर क्लिनिकचे संस्थापक वैद्य योगेश बेंडाळे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या संशोधनात २०२० ते २०२५ या कालावधीत रसायु कॅन्सर क्लिनिकमध्ये उपचारासाठी आलेल्या ३,३५१ कॅन्सर रुग्णांचा अभ्यास करण्यात आला. हा अभ्यास भारतातील कॅन्सर रुग्णांच्या आयुर्वेदाविषयीच्या अपेक्षांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा प्रत्यक्ष प्रमाणावर आधारित अभ्यास मानला जात आहे. 'एक्सपेक्टेशन्स अँड अनमेट नीड्स ऑफ कँसर पेशंट्स सीकिंग आयुर्वेद रसायन थेरपी-अ क्रॉस सेक्शनल स्टडी फ्रॉम इंडिया' असा संशोधन प्रबंध सादर करण्यात आला.

या संशोधनात भारतातील कॅन्सर रुग्णांच्या नेमक्या काय अपेक्षा असतात हे अभ्यासाने हा महत्वाचा उद्देश होता. या अभ्यासातून भारतातील कॅन्सरचे रुग्ण आयुर्वेदाकडे केवळ केमोथेरपी किंवा रेडिओथेरपीचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी येत नसल्याचे स्पष्ट झाले. अभ्यासानुसार केवळ ३१ टक्के रुग्णांनी दुष्परिणामांचे व्यवस्थापन हे आयुर्वेद स्वीकारण्यामागील प्रमुख कारण सांगितले, तर ५१ टक्के रुग्णांनी उत्तम जीवनमान प्राप्त करण्यासाठी आयुर्वेदाची निवड केली. याशिवाय उत्तम जीवनमान, अधिक काळ चांगले आरोग्य, रोगावर प्रभावी नियंत्रण, मानसिक आधार आणि उपचारप्रवासात विश्वासार्ह मार्गदर्शन मिळावे, या अपेक्षेने रुग्ण आयुर्वेदाचा आधार घेत असल्याचे निष्कर्ष समोर आले. संशोधनात २७ टक्के रुग्णांनी पूर्वीच्या उपचारांबाबत समाधान नसल्यामुळे आयुर्वेदाची निवड केल्याचे, तर ७.५ टक्के रुग्णांनी मुख्य उपचार पूर्ण झाल्यानंतर कॅन्सर पुनः उद्भवू नये याकरिता आयुर्वेदाचा आधार घेतल्याचे आढळले, असे वैद्य योगेश बेंडाळे यांनी नमूद केले.

या संशोधनातील अत्यंत महत्वाची विशेष बाब म्हणजे, प्रत्येक तीन रुग्णांपैकी एका रुग्णाला (म्हणजे सुमारे ३० टक्क्याहून अधिक) स्वतःच्या कर्करोगाच्या अवस्थेची माहिती नव्हती, तर प्रगत अवस्थेतील सुमारे २२ टक्के रुग्णांमध्ये पूर्णपणे बरे होण्याची अवास्तव अपेक्षा असल्याचेही संशोधनातून स्पष्ट झाले. हे निष्कर्ष कॅन्सर रुग्णांना / नातेवाईकांना या आजाराविषयी योग्य वेळी योग्य माहिती देणे तसेच वैद्यकीय तज्ज्ञ आणि रुग्णांमधील संवाद अधिक पारदर्शक व प्रभावी करण्याची तातडीची गरज अधोरेखित करतात.

> वैद्य योगेश बेंडाळे म्हणाले, "कर्करोगाचा उपचार म्हणजे केवळ रोगावर मात करणे नव्हे, तर रुग्णाला उत्तम जीवनमान, कमी दुष्परिणाम आणि योग्य वेळी योग्य मार्गदर्शन मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. समावेशक कर्करोग उपचार अधिक प्रभावी करण्यासाठी पुराव्यावर आधारित संशोधन आणि रुग्णप्रशिक्षण ही काळाची गरज आहे. यामुळे रुग्णांना योग्य चिकित्सेची निवड करणे सोयीचे होईल."

## ‘चूजिंग गोल्ड’मधून डॉ. सौरभ गाडगीळ यांचा प्रेरणादायी प्रवास उलगडणार




अहिल्यानगर : (स. गांवकरी)

पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या ‘चूजिंग गोल्ड’ या आत्मचरित्राचे प्रकाशन करण्यात आले आहे. पेंग्विन रँडम हाऊस इंडियाने राष्ट्रीय स्तरावर प्रकाशित केलेल्या या पुस्तकातून डॉ. गाडगीळ यांच्या आयुष्यातील अनुभव, संघर्ष, निर्णय, अपयश, आत्मसंशय आणि नेतृत्वाचा प्रवास उलगडला आहे. भारतातील सर्वात जुन्या आणि प्रतिष्ठित सराफी व्यावसायिक घराण्यांपैकी एक असलेल्या पीएनजी ज्वेलर्सचा वारसा वयाच्या मध्यतिशीत स्वीकारल्यानंतर डॉ. गाडगीळ यांनी परंपरेचा सन्मान राखत व्यवसायाला नवी दिशा दिली. आज वयाच्या एकोणपन्नाशीत आपल्या प्रवासाकडे मागे वळून पाहताना त्यांनी आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे आणि त्यातून मिळालेल्या शिकवणींचा प्रांजळ वेध या आत्मचरित्रातून घेतला आहे. ‘चूजिंग गोल्ड’ हे केवळ व्यवसायातील यशाची कहाणी नसून, एका वारसदाराच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा आणि स्वतःची स्वतंत्र वाट निर्माण करण्याच्या संघर्षाचा दस्तऐवज आहे. आजोबा आणि आई यांच्यासोबतचे संवाद, आयुष्याला कलाटणी देणारे प्रसंग, अपयश, कठीण निर्णय तसेच विश्वास, धैर्य आणि मूल्यांची झालेली कसोटी या पुस्तकात मांडण्यात आली आहे.

## रेकिट आणि एएससीआय यांनी ‘स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा अधिक सुरक्षित करण्यासाठी’ 'सेफर चॅलेंज' स्पर्धा केली सुरू

- परवडणारी वायूशोधक उपकरणे विकसित करण्यासाठी राष्ट्रीय स्पर्धेद्वारे नवकल्पना संशोधकांना आमंत्रण, विजेत्या उत्पादांना अनुदान, मार्गदर्शन आणि प्रायोगिक संधी मिळणार

पुणे : (स. गांवकरी)




स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय शोधण्याच्या उद्देशाने रेकिट आणि ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया यांनी 'सेफर चॅलेंज' ही स्पर्धा सुरू केली आहे. हे अशा प्रकारचे पहिलेच नाविन्यपूर्णतेचे राष्ट्रीय आव्हान आहे. यामध्ये स्टार्टअप्स, अभियंते, संशोधक, शैक्षणिक संस्था आणि तंत्रज्ञान इनोव्हेटर्सना गटार आणि सेप्टिक टँक साफसफाईच्या कामांदरम्यान सुरक्षा सुधारण्यासाठी मदत करणारी परवडणारी, परिधान करण्यायोग्य वायूशोधक उपकरणे विकसित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले आहे. भारतात स्वच्छतेची पायाभूत सुविधा अधिक मजबूत करण्यात येत आहे. अशा वेळेस स्वच्छता कर्मचाऱ्यांची सुरक्षा सुनिश्चित करणे हे तितकेच महत्त्वाचे आव्हान आहे. विषारी वायू आणि ऑक्सिजनची कमतरता असलेल्या वातावरणाच्या संपर्कात येणे हे मृत्यूच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. कामगारांची सुरक्षा अधिक मजबूत करतील आणि त्याच वेळी भारताच्या अधिक सुरक्षित व अधिक यांत्रिकीकृत स्वच्छता प्रणालींच्या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांना पूरक ठरतील, अशा नवकल्पनांना 'सेफर चॅलेंज'च्या माध्यमातून प्रोत्साहन देणे हा रेकिट आणि एएससीआय यांचा उद्देश आहे.

धोकादायक वायूंचा रिअल-टाइममध्ये शोध घेण्यास सक्षम असलेले वापरता येण्याजोगे तंत्रज्ञान विकसित करण्याकरिता संपूर्ण भारतातील स्टार्टअप्स, वैयक्तिक अभियंते, डिझाइनर्स आणि इनोव्हेटर्ससाठी अर्ज आता खुले झाले आहेत. जी उत्पादने परवडणारी आहेत, प्रत्यक्ष कार्यक्षेत्रात वापरण्यास सोपी आहेत आणि स्वच्छतेच्या कामांदरम्यान वेळेवर हस्तक्षेप करण्यास साहाय्य करणारे असतील, अशा उपायांचा या स्पर्धेत शोध घेतला जात आहे. हा उपक्रम भारत सरकारच्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेशी सुसंगत असून, 'स्वच्छ भारत मिशन २.०', 'नमस्ते' आणि 'सफाई मित्र सुरक्षा चॅलेंज' यांसारख्या कार्यक्रमांना पूरक आहे. या शुभारंभप्रसंगी बोलताना रवी भटनागर, कम्युनिकेशन्स अँड कॉर्पोरेट अफेअर्स डायरेक्टर, दक्षिण आशिया, एमईएनएआरपी (MENARP) आणि आफ्रिका म्हणाले, “शौचालयांची उपलब्धता वाढवण्यात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे; पुढील टप्प्यात स्वच्छता अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि शाश्वत बनवण्यावर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. रेकिटमध्ये नेहमी योग्य तेच करणे हा आमच्या कार्यपद्धतीचा गाभा आहे. त्यामुळे आमच्या कृतींचा समाजावर दीर्घकाळ टिकणारा सकारात्मक परिणाम होईल याची आम्ही सुनिश्चिती करतो.

## सिग्नेचर ग्लोबलने पहिल्या तिमाहीत ₹५.५ अब्ज महसूल नोंदवला

**प्री-सेल्समध्ये २५% वाढ होऊन ₹१९.७ अब्ज**

पुणे : (स. गांवकरी)

भारतातील आघाडीच्या रिअल इस्टेट विकासकांपैकी एक असलेल्या सिग्नेचर ग्लोबल (इंडिया) लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने या तिमाहीत ₹५.५ अब्ज महसूल नोंदवला असून ₹६.७ अब्ज कलेक्शन केले आहे.

निवासी प्रकल्पांना सातत्याने मिळत असलेल्या मागणीमुळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत कंपनीची प्री-सेल्स तिमाही-दर-तिमाही २५ टक्क्यांनी वाढून ₹१९.७ अब्जांवर पोहोचली. तसेच सरासरी विक्री दर (Average Sales Realisation) वाढून प्रति चौरस फूट ₹१७,०९३ झाला असून, आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये तो ₹१५,२५० प्रति चौरस फूट होता. 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस' प्रकल्पाच्या लॉन्चमुळे ही वाढ झाली आहे. या तिमाहीत कंपनीने 'टोनिनो लॅम्बोर्गिनी रेसिडेन्सेस' लॉन्च करत प्रीमियम हाऊसिंग पोर्टफोलिओ अधिक मजबूत केला आणि वेगाने वाढणाऱ्या 'ब्रँडेड रेसिडेन्स' विभागात धोरणात्मक प्रवेश केला. प्रसिद्ध इटालियन ब्रँड 'टोनिनो लॅम्बोर्गिनी' यांच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पाद्वारे टोनिनो लॅम्बोर्गिनीने भारतीय रिअल इस्टेट बाजारात महत्त्वपूर्ण प्रवेश केला आहे. गुरुग्राममधील सेक्टर-७१, सदर्न पेरिफेरल रोड (SPR) येथे सुरू करण्यात आलेल्या या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याला ग्राहकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, कंपनीच्या प्री-सेल्समध्ये त्याचा मोठा वाटा राहिला आहे. तसेच प्रीमियम घरांच्या वाढत्या मागणीवर लक्ष केंद्रित करण्याच्या सिग्नेचर ग्लोबलच्या धोरणालाही यामुळे बळ मिळाले आहे. तिमाहीअखेर कंपनीचे



निव्वळ कर्ज (नेट डेट) ₹३.९ अब्ज इतके होते. ३० जून २०२६ पर्यंत कंपनीकडे मुदत ठेवींसह ₹२५.२२ अब्ज इतकी रोख व बँक शिल्लक होती. यामुळे कंपनीची मजबूत आर्थिक स्थिती आणि भविष्यातील वाढीसाठी आवश्यक असलेली आर्थिक लवचिकता अधोरेखित होते. कंपनीच्या कामगिरीबाबत भाष्य करताना चेअरमन आणि पूर्णवेळ संचालक प्रदीप कुमार अग्रवाल म्हणाले, "या तिमाहीतील कामगिरी आमच्या व्यवसाय मॉडेलची ताकद आणि शिस्तबद्ध अंमलबजावणीची क्षमता दर्शवते. प्रकल्पांच्या वेळापत्रकामुळे महसुलावर काहीसा परिणाम झाला असला, तरी आमच्या व्यवसायाची मूलभूत ताकद आणि कामाचा वेग कायम मजबूत राहिला आहे. मजबूत प्रकल्प पाइपलाइन आणि बांधकामातील सातत्यपूर्ण प्रगतीमुळे त्याला पाठबळ मिळाले आहे. चांगली बाजारपेठीय मागणी, उत्तम उत्पादन मिश्रण आणि वाढलेला विक्री दर यामुळे प्री-सेल्समध्ये भक्कम वाढ झाली असून, घर खरेदीदारांचा सिग्नेचर ग्लोबलवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. टोनिनो लॅम्बोर्गिनीसोबतच्या भागीदारीमुळे आम्ही ब्रँडेड रेसिडेन्स विभागात प्रवेश केला असून, या प्रकल्पाला मिळालेला प्रतिसाद आमच्या प्रीमियम हाऊसिंग धोरणाची यशस्वी अंमलबजावणी दर्शवतो. पायाभूत सुविधांचा विकास, सुधारलेली कनेक्टिव्हिटी आणि घरांची सातत्याने वाढणारी मागणी यामुळे गुरुग्रामच्या रिअल इस्टेट बाजारात आगामी काळातही वेगवान वाढ होण्याची अपेक्षा आहे.

## विवोने भारतात नवीन विवो एसर Vivo S2 केला सादर

नवी दिल्ली : (स. गांवकरी)

विवो इंडियाने आज आपल्या नवीन विवो एस२ (Vivo S2) च्या लॉन्चची घोषणा केली, ज्यामुळे भारतात एस-सिरीजचे (S-series) पुनरागमन झाले आहे. उत्कृष्ट कारागिरी, फ्लॅगशिप-स्तरीय डिझाइन, प्रगत इमेजिंग क्षमता आणि विश्वसनीय दैनंदिन कामगिरी यांचा मेळ साधणारा विवो एस२ (Vivo S2) अशा पिढीसाठी डिझाइन केला आहे, जी आपल्या स्मार्टफोनला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि शैलीचा एक भाग मानते. प्रीमियम मिड-रेंज सेगमेंटमध्ये विवोचे स्थान अधिक मजबूत करणारा विवो एस२ (Vivo S2), आजच्या बदलत्या ग्राहकांसाठी सौंदर्य, सर्जनशीलता आणि व्यावहारिकता यांचा परिपूर्ण मिलाफ सादर करतो. स्व-अभिव्यक्तीच्या तत्त्वज्ञानावर आधारित, विवो एस२ (Vivo S2) तरुण वापरकर्त्यांना सहजतेने निर्मिती करण्यास,




कनेक्ट होण्यास आणि शेअर करण्यास सक्षम करतो. अविस्मरणीय क्षण टिपणे असो, कंटेंट तयार करणे असो, दिवसभर मल्टीटास्किंग करणे असो किंवा उत्तम मनोरंजनाचा आनंद घेणे असो, हा स्मार्टफोन आधुनिक जीवनशैलीशी जुळवून घेण्यासाठी आणि एक अखंड दैनंदिन अनुभव देण्यासाठी डिझाइन केला आहे. विवो एस२ सिल्क व्हाइट, सफायर ब्लू आणि रीगल ब्रॉंझ या तीन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असेल. हे डिव्हाइस ११ ऑगस्ट २०२६ पासून विवोच्या अधिकृत वेबसाइट, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन आणि पार्टनर रिटेल स्टोअर्सवर उपलब्ध होईल.

## स्वायत्तेमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला, गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्रोत्साहन

### प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांचे प्रतिपादन; सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशनला स्वायत्त दर्जा

पुणे : (स. गांवकरी)




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अँड मास कम्युनिकेशन (एसआयएमएमसी) या अग्रगण्य संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्वायत्त (आटोनॉमस) दर्जा प्रदान करण्यात आला आहे. संस्थेच्या शैक्षणिक उत्कृष्टता, नवोपक्रम, संशोधन आणि जागतिक दर्जाच्या शिक्षणाच्या दिशेने वाटचालीतील हा एक ऐतिहासिक टप्पा मानला जात आहे. 'एसआयएमएमसी'मध्ये एमबीए, एमसीए, बीबीए आणि बीसीए हे अभ्यासक्रम उपलब्ध असून, उद्योगाभिमुख कौशल्ये, नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून भविष्यातील सक्षम व्यावसायिक घडविण्यावर संस्थेचा भर आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता आणि 'नॅक'कडून 'ए' श्रेणी प्राप्त एसआयएमएमसी'ने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन, उद्योग-संलग्नता, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासामध्ये सातत्यपूर्ण उत्कृष्ट कामगिरी केली आहे. स्वायत्त दर्जामुळे संस्थेला अभ्यासक्रमांची रचना, मूल्यमापन पद्धती, उद्योगाभिमुख विषयांचा समावेश, संशोधनाला चालना तसेच नवोपक्रमशील शैक्षणिक उपक्रम राबविण्याचे अधिक स्वातंत्र्य मिळणार आहे. बदलत्या जागतिक आणि डिजिटल युगाशी सुसंगत अभ्यासक्रम विकसित करताना कौशल्याधारित शिक्षण, लवचिक मूल्यमापन, लाइव्ह प्रोजेक्ट्स, उद्योगाभिमुख इंटर्नशिप, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि अनुभवाधारित शिक्षणावर अधिक भर दिला जाणार आहे. स्वायत्ततेमुळे 'एसआयएमएमसी'ला जागतिक उद्योग क्षेत्रातील बदलत्या गरजा आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन अत्याधुनिक व उद्योगाभिमुख ऐच्छिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. याअंतर्गत विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि जनरेटिव्ह एआय, सोशल मीडिया व डिजिटल जाहिरात, इन्फ्लुएंसर व कंटेंट क्रिएटर मार्केटिंग, ग्राहकांच्या ऑनलाइन वर्तनाचा अभ्यास, ग्राहकांच्या आवडी-निवडी समजून घेऊन मार्केटिंग करण्याच्या पद्धती, ऑनलाइन खरेदी-विक्री आणि डिजिटल व्यवसाय व्यवस्थापन, आर्थिक अहवाल समजून घेणे व कंपन्यांच्या आर्थिक स्थितीचे विश्लेषण, पर्यावरणपूरक व जबाबदार व्यवसाय आणि गुंतवणूक, व्यक्तिमत्त्व व क्षमता ओळखण्यासाठी मानसशास्त्रीय चाचण्या, नेतृत्वगुण व भविष्यातील नेतृत्वाची तयारी, व्यवसायातील जोखीम ओळखून त्याचे विश्लेषण, सोशल मीडिया आणि वेबसाइटच्या कामगिरीचे विश्लेषण, क्लाउड तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डेटाचे विश्लेषण, शेतीमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर, कृषी व्यवसाय व धोरणे, ऑनलाइन ग्राहकांशी संबंध व्यवस्थापन, ऑनलाइन पार्टनरच्या माध्यमातून विक्री वाढविण्याच्या पद्धती, ई-कॉमर्स व ऑनलाइन मार्केटप्लेसचे व्यवस्थापन तसेच व्हिडिओ मार्केटिंग आणि YouTube चॅनेलची प्रभावी रणनीती अशा भविष्योन्मुख विषयांचा अभ्यास करण्याची संधी मिळू शकेल. या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञानाचा वापर, डिजिटल व्यवसाय, डेटाच्या आधारे योग्य निर्णय घेणे, ग्राहकांना समजून घेणे, आर्थिक नियोजन, शाश्वत व्यवसाय, नेतृत्व, नवकल्पना आणि उद्योजकता यांचा प्रत्यक्ष व व्यावहारिक अनुभव मिळेल.

# बोगस कांदा बियाणे, खते व औषधांपासून सावध रहा

## तालुका कृषी अधिकारी वाल्मीक पाटील यांचे शेतकऱ्यांना आवाहन

कळवण : (स. गांवकरी)

कळवण तालुक्यात पावसाने काही दिवस विश्रांती घेतल्याने शेतकरी पुन्हा जोमाने शेती मशागत, पेरणी, खत व्यवस्थापन आणि आगामी लाल व उन्हाळी कांदा लागवडीच्या तयारीला लागले आहेत. या पार्श्वभूमीवर तालुका कृषी अधिकारी वाल्मीक पाटील यांनी शेतकऱ्यांना सावधगिरीचा इशारा देत बोगस बियाणे, खते आणि कृषी औषधांपासून सतर्क राहण्याचे तसेच प्रत्येक खरेदीवेळी पक्के बिल घेण्याचे आवाहन केले आहे.

वाल्मीक पाटील यांनी सांगितले की, सध्या बाजारात विविध कंपन्यांचे कांदा बियाणे, खते आणि कृषी औषधे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होत आहेत. याच संधीचा गैरफायदा घेत काही अप्रामाणिक व्यक्ती व बाहेरील विक्रेते बोगस किंवा निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्री करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे कोणतेही कांदा बियाणे, विशेषतः लाल व उन्हाळी कांदा बियाणे खरेदी करताना अधिकृत परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावी आणि पक्के बिल घ्यावे. कृषी अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, बियाण्याची उगवण क्षमता कमी आढळल्यास, खत किंवा औषध निकृष्ट दर्जाचे निघाल्यास शेतकऱ्यांनी तात्काळ पक्क्या बिलासह कृषी विभागाकडे तक्रार करावी. बिल असल्यास संबंधित विक्रेत्यावर किंवा कंपनीवर नियमानुसार कारवाई करणे शक्य होते. मात्र, बिल नसल्यास कारवाई करणे अत्यंत कठीण ठरते. त्यामुळे पक्के बिल हेच शेतकऱ्यांच्या हक्काचे आणि संरक्षणाचे सर्वात महत्त्वाचे दस्तऐवज असल्याचे त्यांनी सांगितले. गावात किंवा बाजारपेठेत बाहेरील व्यक्तींकडून बोगस कांदा बियाणे, बोगस खते, कृषी औषधे किंवा बिना बिल विक्री होत असल्याचे आढळल्यास शेतकऱ्यांनी कोणतीही भीती न बाळगता तात्काळ तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

वाल्मीक पाटील यांनी सामाजिक जबाबदारीचाही संदेश दिला. प्रत्येक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतो. त्यामुळे सक्षम आणि सधन शेतकऱ्यांनी गरजू शेतकऱ्यांना मार्गदर्शन, सहकार्य आणि योग्य माहिती देऊन त्यांना फसवणुकीपासून वाचवावे. शेती हा केवळ व्यवसाय नसून ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे एकमेकांना सहकार्य केल्यास संपूर्ण कृषी क्षेत्र अधिक सक्षम होईल, असे त्यांनी नमूद केले.



ठाणे : ठाणे महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. २९ मधील सरकारी पॉलीटेक्निकल कॉलेज फडकेपाडा येथे आज आकर्षक झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. प्रसंगी नगरसेवक बाबाजी पाटील, नगरसेविका अर्चना निलेश पाटील, ठाणे जिल्हा सहकारी बँकेचे संचालक आकाश पाटील, शिवसैनिक दत्तूमामा पाटील, नाना मोकाशी, राजेश जांभळे, संजय लाहोत आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. **(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...




### प्रदिप महाराज एम. ए. साहित्य परिषदेत संकृत परिक्षेत उत्तीर्ण

रावेर (स. गांवकरी) : अध्यत्म कार्यासोबतच उच्च शिक्षणाची कास धरत खिर्डी येथील एका युवा मठाधिपतीने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. एम.ए. संस्कृत साहित्य परीक्षेत महाविद्यालयातून चौथा क्रमांक मिळवत ह.भ.प. प्रदीप महाराज पंजाबी यांनी परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या यशामुळे महानुभाव पंथीय समाजात आनंदाचे वातावरण असून सर्व स्तरातून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. रावेर तालुक्यातील खिर्डी येथील श्रीकृष्ण मंदिर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प. प्रदीप नरेंद्र उर्फ प्रदीप महाराज पंजाबी यांनी कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक मान्यताप्राप्त श्री चक्रधर स्वामी महाविद्यालय, अंबड येथून एम.ए. संस्कृत साहित्य परीक्षेत महाविद्यालयातून चौथा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अध्यात्म, समाजकार्य आणि शिक्षण यांचा समतोल साधत मिळविलेल्या या यशामुळे महानुभाव पंथीय समाजासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. धार्मिक सेवेसोबतच उच्च शिक्षणाची वाटचाल कायम ठेवत त्यांनी युवकांसमोर प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या यशाबद्दल जळगाव जिल्हा महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत पांढरीकर बाबा तळेगावकर, अखिल भारतीय महानुभाव युवा परिषदेचे सचिव आचार्य मानेकर बाबा, श्रीकृष्ण मंदिर संस्थानचे अध्यक्ष आचार्य चोरमागे बाबा तसेच विविध सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. जबाबदाऱ्या सांभाळत उच्च शिक्षणातही उल्लेखनीय यश संपादन करता येते, हे ह.भ.प. प्रदीप महाराज पंजाबी यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. एम.ए. संस्कृत साहित्य परीक्षेत मिळविलेल्या या यशामुळे खिर्डीसह संपूर्ण रावेर तालुक्यात त्यांचे कौतुक होत आहे. आगामी काळातही ते धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात अशीच उल्लेखनीय कामगिरी करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

### ग्लोबल महाविद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत



सोलापूर (स. गांवकरी) : कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.सी.ए. प्रथम वर्षाच्या नवागत विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. अनिकेत चनशेट्टी होते. प्राचार्य डॉ. वाय. डी. पुजारी यांनी प्रास्ताविकातून महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, कौशल्य विकास उपक्रम, रोजगाराभिमुख शिक्षण आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध सुविधांची माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात प्रा. अनिकेत चनशेट्टी यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच शिस्त, आत्मविश्वास, कौशल्य विकास आणि सामाजिक बांधिलकी जोपासत सर्वांगीण व्यक्तिमत्त्व घडविण्यावर भर द्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे जवाहर महाविद्यालयाचे प्राचार्य तथा ग्लोबल व्हिलेज शिक्षण संकुलाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी व्हिडिओ कॉलद्वारे विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी उच्च शिक्षणातील संधी, कठोर परिश्रम, सकारात्मक दृष्टिकोन आणि सातत्य यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दिपाली कसबे यांनी केले, तर प्रा. राहुल काळे यांनी आभार मानले. यावेळी प्रा. प्रदिप राठोड, प्रा. रोहिणी बिराजदार, प्रा. ज्योती लकडे, प्रा. गोपाळ चव्हाण, प्रा. जाधव, प्रा. पंढरीनाथ हरिदास, श्री. महेश भासगी यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी तसेच बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. व बी.सी.ए. चे नवागत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### 'बॉटल्स फॉर चेंज' उपक्रमाचा ठाणे महापालिकेत शुभारंभ



ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महानगरपालिका शिक्षण विभाग आणि बिसलेरी इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिक कचरा व्यवस्थापन, पुनर्वापर आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी 'बॉटल्स फॉर चेंज' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आज महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते करण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जबाबदारीची भावना निर्माण होण्यासाठी व पर्यावरण संवर्धनाची चळवळ अधिक बळकट होण्यासाठी मदत होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये कचरा वर्गीकरणाची सवय, प्लास्टिक संकलन आणि पुनर्प्रक्रियेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार असल्याचे महापौरांनी नमूद केले.

## आरी वर्क प्रशिक्षण व प्रमाणपत्र वितरण समारंभ उत्साहात संपन्न

वडगाव आनंद : (स. गांवकरी)

ग्रामपंचायत वडगाव आनंद व युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला आरी वर्क (भरतकाम) प्रशिक्षण व प्रमाणपत्र वितरण समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. राजू चौगुले यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार आदरणीय श्री. शरद दादा सोनवणे उपस्थित होते. त्यांनी आपल्या मनोगतात ग्रामपंचायत वडगाव आनंद मधील विकास कामांसाठी कोणत्याही प्रकारचा निधी कमी पडू देणार नाही, असे ठाम आश्वासन दिले. तसेच पंचायत समितीच्या सभापती आदरणीय कमलताई शेळकंदे यांनी पंचायत समितीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीसाठी राबवता येणारे सर्व उपक्रम उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.



हे प्रशिक्षण महिनाभर चालले असून या प्रशिक्षणात शंभरहून अधिक महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपली कलाकुसर सादर केली. महिलांच्या कौशल्याला वाव मिळावा यासाठी ग्रामपंचायत सदस्या सौ. निशा वाळुंज यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रयत्नातून सौ. रेखा भिसे व प्रशिक्षक सौ. सोनाली इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. कार्यक्रमास आमदार श्री. शरद सोनवणे, जिल्हा परिषद सदस्य श्री. मंगेश अण्णा काकडे, पंचायत समिती जुन्नरच्या सभापती कमलताई शेळकंदे, पंचायत समिती सदस्य सपना शिंदे व जयसिंग पोटे, श्रीमती रेऊबाई बाळाजी देवकर विद्यालयाचे अध्यक्ष श्री. उल्हास देवकर, सामाजिक कार्यकर्ते डी बी वाळुंज, पोलिस पाटील दत्तात्रय चौगुले, माजी सरपंच प्रदीप देवकर, विकास सोसायटीचे चेअरमन प्रमोद गडगे, युवा कौशल्य कृषी विकास बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष श्री. ईश्वर निमसे व संस्थेच्या बिझनेस मॅनेजर सौ. रेखा भिसे यांच्यासह ग्रामपंचायत वडगाव आनंदच्या सरपंच सौ. रेलिका जाधव, उपसरपंच श्री.संतोष पादिर, ग्रामपंचायत अधिकारी श्री.मुकणे भाऊसाहेब सर्व सदस्य, कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार असून, ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणासाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला आहे.

## जी. प. डोहाळेपाडा शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

भिवंडी : (स. गांवकरी)

ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने हेल्पिंग हँड फाउंडेशनच्या वतीने 'प्रमोशन एज्युकेशन २०२६' या उपक्रमांतर्गत भिवंडी तालुक्यातील डोहाळेपाडा येथील जिल्हा परिषद शाळेत शैक्षणिक साहित्य वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमाअंतर्गत इयत्ता पहिली ते चौथीतील ५९ विद्यार्थ्यांना शालेय दप्तर, वही संच, लेखन साहित्य, चित्रकला वही, बालमित्र पुस्तके, रंगीत मेण पेन्सिली, पेन्सिल, पेन, खोडरबर, टोकणी, पट्टी, भूमिती पेटी आदी शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना शुद्ध व सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या हेतूने शाळेला इलेक्ट्रिक वॉटर प्युरिफायर भेट देण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांसाठी पोह्यांचा अल्पोपहारही आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला



हेल्पिंग हँड फाउंडेशनचे पदाधिकारी, सदस्य, देणगीदार, स्वयंसेवक, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी मनापासून कौतुक केले. यावेळी फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी सांगितले की, "शिक्षण हीच उज्ज्वल भविष्याची खरी गुरुकिल्ली आहे. प्रत्येक गरजू विद्यार्थ्यापर्यंत आवश्यक शैक्षणिक साहित्य पोहोचवून त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवणे हेच आमचे ध्येय आहे."

## रावेर परिसरात खरिपाची पिके डोलू लागली

रावेर : (स. गांवकरी)

उशिरा का होईना, मात्र दमदार पावसाने रावेर तालुक्यात हजेरी लावल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. पावसामुळे तालुक्यातील खरिपाची पिके जोमाने वाढू लागली असून शेतशिवार हिरवेगार झाले आहे. पिकांच्या अंतर्गत मशागतीला वेग आला असून निंदणी, कोळपणीसह अन्य शेतीकामांसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरू झाली आहे.

मध्य प्रदेशाच्या सीमेलगत असलेल्या रावेर तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र तीन वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनींमध्ये विभागलेले आहे. तालुक्याच्या मध्य भागात काळी माती, तापी नदीकाठच्या परिसरात पांढरी माती, तर सातपुडा पर्वतरांगांच्या लगतच्या भागात मुरमाड व दगडी स्वरूपाची जमीन आढळते. त्यामुळे या तिन्ही भागांत भौगोलिक परिस्थितीनुसार वेगवेगळी पिके घेतली जातात.

काळ्या जमिनीच्या भागात ज्वारीचा पेरा मोठ्या प्रमाणावर केला जातो. तापी नदीकाठच्या भागात मका व कापूस ही प्रमुख पिके आहेत.



- निंदणी, कोळपणीच्या कामांना वेग; मजूरटंचाई जाणवू लागली

तर लालसर व मुरमाड जमिनीच्या क्षेत्रात भुईमूग, चवळी, उडीद, मूग यांसह विविध कडधान्यांची पिके घेतली जातात. रावेर तालुक्याची प्रमुख ओळख असलेल्या केळीचे पीकही मोठ्या क्षेत्रावर घेतले जाते. तालुक्यातील सुमारे ७० ते ७५ टक्के क्षेत्र केळीच्या लागवडीखाली असल्याचे सांगितले जाते. रावेर तालुक्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र मोठे असून तालुक्यात सुमारे १२० गावे आहेत. त्यापैकी २४ गावे पूर्णपणे आदिवासीबहुल आहेत.

## 'सोलापुरी चादरी'चा गौरव थेट पंतप्रधानांकडे; खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांची आंतरराष्ट्रीय ब्रँडिंगची मागणी

### टेक्स्टाईल उद्योगाला नवसंजीवनी देण्याची मोदींची ग्वाही

सोलापूर : (स. गांवकरी)

राष्ट्रीय हातमाग दिनाच्या औचित्याने राज्यसभा खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पंतप्रधान निवासस्थानी भेट घेऊन सोलापूरची जागतिक ओळख असलेल्या हातमाग परंपरेचे प्रतीक मानली जाणारी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची प्रतिमा विणलेली विशेष सोलापुरी चादर भेट दिली. या आगळ्यावेगळ्या भेटीने सोलापूरच्या हातमाग उद्योगाची परंपरा, कौशल्य आणि सांस्कृतिक वैभवाला राष्ट्रीय स्तरावर विशेष अधोरेखित करण्यात आले. एनडीएच्या नवनिर्वाचित राज्यसभा आणि लोकसभा खासदारांसाठी आयोजित विशेष अल्पोपहार कार्यक्रमात डॉ. ज्योती वाघमारे यांनी पंतप्रधानांना ही अनोखी भेट सुपूर्द केली. सोलापुरी चादरीवरील स्वतःची प्रतिमा पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अप्रतिम कलाकृतीचे आणि सोलापूरच्या हातमाग परंपरेचे मनापासून कौतुक



केले. सोलापूरच्या विणकरांनी जपलेले कौशल्य हे देशाची अमूल्य परंपरा असल्याचे सांगत, सोलापूरच्या टेक्स्टाईल उद्योगाला नवऊर्जा देण्यासाठी केंद्र सरकार सकारात्मक पावले उचलेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी खासदार डॉ. ज्योती वाघमारे यांनी सोलापुरी चादरीचे आंतरराष्ट्रीय ब्रॅण्डिंग करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष धोरण आखावे, अशी ठाम मागणी केली. सोलापुरी चादरीला जागतिक बाजारपेठ उपलब्ध झाल्यास सोलापूरच्या वस्त्रोद्योगाला नवी चालना मिळेल, हजारो हातमाग कामगार, विणकर, लघुउद्योजक आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबांचे आर्थिक जीवनमान उंचावेल, असे त्यांनी पंतप्रधानांना सांगितले. सोलापुरी चादर हा केवळ एक उत्पादन नसून सोलापूरच्या अस्मितेचा आणि श्रमसंस्कृतीचा जागतिक ब्रँड आहे, असेही त्यांनी नमूद केले संवादादरम्यान डॉ. वाघमारे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत इंग्रजी विषयात पीएच. डी. पूर्ण केल्याचा संघर्षमय प्रवास पंतप्रधानांसमोर मांडला. गरीब कुटुंबातील आणि आंबेडकरी चळवळीतील एका दलित मुलीला शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथभाई शिंदे यांनी राज्यसभेवर पाठवून देशसेवेची संधी दिली, याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तसेच आपण राहत असलेल्या भागाचे नावही मोदी परिसर असल्याचा रंजक उल्लेख त्यांनी यावेळी केला. डॉ. वाघमारे यांच्या संघर्षाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक करत त्यांच्या कार्याला शुभेच्छा दिल्या तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याप्रतीही सद्भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा, भाजपाचे राष्ट्रीय सरचिटणीस नितीन नवीन तसेच एनडीएचे सर्व नवनिर्वाचित खासदार उपस्थित होते यावेळी प्रतिक्रिया देताना खासदार प्रा. डॉ. ज्योती वाघमारे म्हणाल्या, सोलापुरी चादरला जागतिक दर्जाची ओळख मिळवून देणे ही माझी प्राथमिकता आहे. सोलापूरच्या हातमाग आणि टेक्स्टाईल उद्योगाला नवसंजीवनी मिळावी, प्रत्येक विणकराच्या हाताला काम मिळावे आणि सोलापूर पुन्हा वस्त्रोद्योगाची राजधानी म्हणून देशभरात उभे राहावे, यासाठी मी संसदेत आणि केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करणार आहे.

## अत्याधुनिक ईएनटी व नेत्ररोग उपचारांमुळे रुग्णांना नवे आरोग्य, नवी दृष्टी

### अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियांना यश

नाशिक : (स. गांवकरी)

आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे नाक, कान, घसा (ENT) तसेच नेत्ररोगांच्या उपचारांमध्ये मोठी क्रांती झाली असून, अनेक गुंतागुंतीच्या आजारांवर अत्यंत सुरक्षित, अचूक आणि प्रभावी उपचार करणे शक्य झाले आहे. अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ईएनटी आणि नेत्ररोग विभागात विविध यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात येत असून, याबाबतची माहिती ईएनटी शल्यचिकित्सक डॉ. पंकज भट आणि नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रियंका भट यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी हॉस्पिटलतर्फे



नागरिकांसाठी विशेष उपक्रमाची घोषणा करण्यात आली. नेत्ररोग विभागामध्ये प्रथमच येणाऱ्या रुग्णांसाठी नेत्ररोगतज्ज्ञांची (First Ophthalmology Consultation) पहिली तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली असून, डोळ्यांशी संबंधित कोणतीही तक्रार असल्यास किंवा नियमित नेत्रतपासणी करून घ्यायची असल्यास नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. यावेळी बोलताना ईएनटी शल्यचिकित्सक डॉ. पंकज भट म्हणाले, "घसा बसणे, आवाजात सतत बदल होणे किंवा दोन ते तीन आठवड्यांपेक्षा जास्त काळ आवाज खराब राहणे ही साधी समस्या समजून दुर्लक्ष करू नये. शिक्षक, गायक, कॉल सेंटर कर्मचारी, व्यावसायिक वक्ते तसेच सतत आवाजाचा वापर करणाऱ्या व्यक्तींमध्ये स्वरयंत्रावर सतत ताण येत असल्यामुळे व्होकल कॉर्ड पॉलिप, नोड्युल्स किंवा इतर स्वरयंत्र विकार निर्माण होऊ शकतात. योग्य वेळी तपासणी आणि उपचार घेतल्यास हे आजार पूर्णपणे बरे होऊ शकतात." ते पुढे म्हणाले, "अलीकडेच आमच्याकडे ४४ वर्षीय महिला रुग्णावर यशस्वी उपचार करण्यात आले. अनेक दिवसांपासून त्यांना आवाज बसण्याचा आणि आवाजात बदल होण्याचा त्रास होत होता. अत्याधुनिक व्हिडिओ लॅरिंगोस्कोपीद्वारे तपासणी केली असता त्यांच्या उजव्या स्वरतंतूवर व्होकल कॉर्ड पॉलिप असल्याचे निदान झाले. त्यानंतर मायक्रो लॅरिंगोस्कोपी विथ व्होकल पॉलिप एक्सिशन ही सूक्ष्म शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आली. शस्त्रक्रियेनंतर त्यांच्या आवाजात लक्षणीय सुधारणा झाली असून त्यांना तात्काळ आराम मिळाला आहे." "आज एंडोस्कोपिक तंत्रज्ञानामुळे अशा शस्त्रक्रिया अत्यंत अचूक आणि सुरक्षितपणे करता येतात. रुग्णाला मोठी जखम होत नाही, वेदना आणि रक्तस्त्राव कमी होतो तसेच रिकव्हरीचा कालावधीही कमी असतो. त्यामुळे रुग्ण लवकरच पूर्ववत दैनंदिन जीवन सुरू करू शकतो. दोन आठवड्यांपेक्षा जास्त काळ आवाजात बदल होत असल्यास तो केवळ सर्दी-खोकल्यामुळे आहे असे समजून दुर्लक्ष करू नये. वेळेत ईएनटी तज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास गंभीर आजार टाळता येऊ शकतात," असे आवाहनही त्यांनी केले. नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रियंका भट म्हणाल्या, "मोतीबिंदू आणि काचबिंदू हे अंधत्वास कारणीभूत ठरणारे दोन प्रमुख नेत्रविकार आहेत. मात्र योग्य वेळी निदान आणि आधुनिक उपचारपद्धतींच्या मदतीने बहुतांश रुग्णांमध्ये दृष्टी सुरक्षित ठेवणे शक्य आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)



डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 | शनिवार दि. ०८ ऑगस्ट २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : ३०८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com



दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net


## शनिवारी अनेक भागांत पावसाचा अंदाज, ७ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी!

मुंबई (समर्थ गांवकरी)

महाराष्ट्रामध्ये मान्सूनचे वारे पुन्हा एकदा सक्रिय झाले असून, राज्याच्या विविध भागांत पावसाचा जोर पुन्हा वाढताना दिसत आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, शनिवारपासून राज्यामध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली असून, विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर हवामान विभागाने राज्यातील एकूण ७ जिल्ह्यांत 'यलो अलर्ट' जारी केला आहे.

विविध विभागांमधील पावसाची स्थिती:

१. मराठवाडा: मराठवाड्यात मान्सूनचे ढग पुन्हा दाटून आले आहेत. छत्रपती संभाजीनगर, बीड आणि धाराशिव जिल्ह्यांत हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर दुसरीकडे, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड आणि लातूर या पाच जिल्ह्यांमध्ये हवामान विभागाने विशेष 'यलो अलर्ट' जारी केला आहे. या भागात काही ठिकाणी ढगांच्या कडकडाटासह आणि विजांच्या लखलखाटासह पाऊस पडू शकतो. तसेच या दरम्यान ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांना आणि शेतकऱ्यांना सतर्क राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत सर्वाधिक लाभार्थी

# जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी रुपयांचा निधी वर्ग

अहिल्यानगर/डॉ विश्वास आरोटे (समर्थ गांवकरी)

- आधार प्रमाणीकरणामध्ये राज्यात प्रथम
- जिल्हा बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकऱ्यांचा समावेश
- इतर बँकेचे ६ हजार ९०३ शेतकरी
- आधारी प्रमाणीकरण करुन घेण्याचे आवाहन

: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना ही राज्य शासनाची अत्यंत महत्वाकांक्षी योजना आहे. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ होऊन पहिल्या टप्प्यात शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम वर्ग करण्यात आली. यावेळी पालकमंत्री डॉ राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था मंगेश सुरवसे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपये एवढी रक्कम वर्ग करण्यात आली असल्याची माहिती पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे.

राज्यातील शेतकरी हा राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. मात्र, अनियमित पाऊस, गारपीट, दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यासारख्या नैसर्गिक आपत्तींमुळे काही वेळेस पिकांचे नुकसान होते. त्यात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते. त्यामुळे बाधित शेतकरी शेती कर्जाची मुदतीत परतफेड करू शकत नाही. असे शेतकरी थकबाकीदार झाल्यामुळे त्यांना बँकाकडून नव्याने पीक कर्ज उपलब्ध होऊ शकत नाही. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यानुसार जिल्ह्यातील ७२ हजार ५५९ शेतकऱ्यांच्या खात्यात ६९७ कोटी ८१ लाख २५ हजार १३९ रुपयांचा लाभ देण्यात आला. ही रक्कम संबंधित शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात जमा करण्यात आली.

यात अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६५ हजार ६५६ शेतकरी सभासदांना ६२२ कोटी ७४ लाख रुपये एवढ्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. तसेच अन्य राष्ट्रीयकृत बँकांमधील सहा हजार ९०३ शेतकरी सभासदांना ७५ कोटी ०७ लाख २५ हजार १३९ रुपये रकमेच्या कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे.

राज्य शासनाने सर्व बँकांना कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या पात्र शेतकऱ्यांना तातडीने खरीप पीक कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, जेणेकरून शेतकऱ्यांना नव्याने शेतीसाठी आर्थिक बळ मिळेल. पहिल्या यादीतील ज्या पात्र शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, त्यांचे प्रमाणीकरण पूर्ण होताच त्यांच्या कर्जखात्यांवरही लाभाची रक्कम टप्प्याटप्प्याने हस्तांतरित करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील उर्वरित शेतकऱ्यांनीही आधार




प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, या योजनेत जिल्ह्यातील एकूण २ लाख ३३ हजार ७११ शेतकरी खातेदारांची माहिती शासनाच्या पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. पहिल्या यादीत १ लाख ३२ हजार ५९१ पात्र शेतकऱ्यांच्या समावेश आहे. त्यापैकी १ लाख १५ हजार ६९२ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केलेले आहे. त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ८ हजार ३६३ शेतकऱ्यांनी अद्यापही फार्मर आयडी काढलेला नाही अशा शेतकऱ्यांनी तात्काळ फार्मर आयडी काढावा तसेच जे मयत खातेदार आहेत अशा खात्यांच्या बाबतीत त्यांच्या वारसाने विकास संस्थेकडे, बँकेकडे वारसाची नोंद लावून घ्यावी असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांनी केले आहे.

## सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी नवीन आयटी नियम कठोर

### आक्षेपार्ह मजकूर हटवण्याची मुदत २४ तासांवरून थेट २ तासांवर

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

केंद्र सरकारने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्ससाठी आक्षेपार्ह आणि संवेदनशील मजकूर हटवण्याच्या मुदतीत मोठी कपात केली आहे. यापूर्वी अशा प्रकारच्या मजकुरावर कारवाई करण्यासाठी २४ तासांचा वेळ दिला जात होता, मात्र नव्या नियमांनुसार आता अवघ्या २ तासांच्या आत असा मजकूर प्लॅटफॉर्मवरून हटवणे बंधनकारक करण्यात आले आहे.

माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मध्ये १० फेब्रुवारी २०२६ रोजी सुधारणा करण्यात आल्या असून, त्या अंतर्गत हे नवीन नियम लागू करण्यात आले आहेत. मुख्यत्वे 'डीपफेक' आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) साहाय्याने तयार करण्यात आलेल्या बनावट किंवा दिशाभूल करणाऱ्या माहितीला डिजिटल विश्वात आळा घालणे, हा यामागील मुख्य उद्देश आहे. नग्नता किंवा एखाद्याची बनावट ओळख सांगणाऱ्या आक्षेपार्ह सामग्रीबाबतच्या तक्रारींवर पूर्वीच्या २४ तासांऐवजी आता अवघ्या २ तासांच्या आत कारवाई करावी लागणार आहे. न्यायालय किंवा सक्षम सरकारी प्राधिकरणाकडून वैध आणि सकारण आदेश प्राप्त झाल्यानंतर बेकायदेशीर मजकूर हटवण्यासाठी आधी ३६ तासांची मुदत होती; आता ही कारवाई ३ तासांच्या आत करावी लागेल.



सामान्यांच्या तक्रारींनाही आता तात्काळ उत्तर द्यावे लागणार आहे. वापरकर्त्यांच्या सामान्य तक्रारींचे निवारण करण्याची मुदत ७२ तासांवरून कमी करून ३६ तास करण्यात आली आहे. भारतात ५० लाखांहून अधिक युजर्स असलेल्या प्रमुख सोशल मीडिया कंपन्यांना बाल लैंगिक शोषण, बलात्कार किंवा पूर्वी हटवण्यात आलेल्या मजकुराशी साम्य असणाऱ्या सामग्रीचा आपोआप शोध घेण्यासाठी ऑटोमेटेड टूल्स आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# अकोले शहरातील कोल्हार घोटी रोड सीडी वर्क संरक्षक कठडे तात्काळ करा : ग्राहक पंचायत

अकोले (समर्थ गांवकरी)

अकोले शहरातील कोल्हार–घोटी रोड सेंन्ट्रल बँक व शॅम्प्रो ऑफिस समोर रोड लगत सतत होत असलेले अपघात होत असून येथे सीडी वर्क व संरक्षक कठडे तात्काळ होण्याबाबत व दिशादर्शक फलक 'झेब्रा–क्रॉसिंग आणि इतर सूचनांचे निवेदन तहसिलदार डॉ.सिध्दार्श मोरे, उपविभागीय अभियंता सार्वजनिक बांधकाम अकोले यांना दिल्याची माहिती ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, माधवराव तिटमे, दत्ता ताजणे यांनी दिली.

निवेदनात म्हटले आहे की अकोले शहरातील कोल्हार घोरी रोड, सेंन्ट्रल बँक व शॅम्प्रो ऑफीस समोर रोड लगत आज पर्यंत बरेच अपघात झाले आहे.

अकोले नगरपंचायत हद्दी मध्ये नेहमी मोटार सायकल, जिप, ट्रक, मोठी आवजड वाहने, महिला, ज्येष्ठ, नागरिक, दिव्यांग व्यक्ती, शालेय विद्यार्थी इ.ये जाय चालू असते. वरिल अपघाताच्या ठिकाणी बाबत ग्राहक पंचायत अकोले व अनेक संघटनांनी व व्यक्तीगत नागरीकांनी सार्वजनिक बांधकाम कार्यालयाकडे लेखी, तोंडी सुचना व तक्रारी केल्या आहेत, याची सार्वजनिक कार्यालय व अधिकारी यांनी दखल घेतलेली वाटत नाही.

तसेच आपले कार्यालय व अधिकारी असे किती अपघात झाल्या नंतर किंवा अपघातात एखाद्याचा जीव गेल्या नंतरच सार्वजनिक बांधकाम विभागाला जाग येणार आहे काय ? असा संतप्त सवाल अकोले शहरातील नागरीकांकडून विचारण्यात येत आहे.




या पूर्वी सर्वोच्च न्यायालयाने रस्ते अपघाताबाबत आदेश व सुचना केल्या आहेत याचे आपल्या सार्वजनिक कार्यालयाने व अधिकाऱ्यांनी पालन करावे व नागरीकांच्या मुलभूत अधिकारांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने आपल्या स्तरावर त्वरित कार्यवाही होईल अशी अपेक्षा आहे असे निवेदनात म्हटले आहे व अन्यथा आंदोलन व रस्ता रोको करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची असेल. निवेदनावर ग्राहक पंचायतचे जिल्हा उपाध्यक्ष मच्छिंद्र मंडलिक, अध्यक्ष दत्ता शेनकर, सचिव राम रुद्रे, कार्याध्यक्ष महेश नवले,प्रा.डॉ. सुनील शिंदे, माधवराव तिटमे, बबनराव तिकांडे, दत्तात्रय ताजणे, सुनील देशमुख, साहेबराव दातखिळे, ज्ञानेश्वर पुंडे, बादशहा ताजणे, रामदास पांडे, भाऊसाहेब वाकचौरे आदींच्या सह्या आहेत.

## पालकमंत्री ना. विखे पाटीलांचा ९ ऑगस्टला पारनेर दौरा

### आमदार काशिनाथ दातेंची माहिती

पारनेर (समर्थ गांवकरी)

शुक्रवार दि. ७ ऑगस्ट २०२६ अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांचा रविवार, दि. ९ ऑगस्ट २०२६ रोजी पारनेर तालुक्यात महत्त्वपूर्ण दौरा आयोजित करण्यात आला असून, या दौऱ्यामुळे तालुक्यातील विकासकामांना नवी गती मिळणार असल्याचा विश्वास पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी व्यक्त केला आहे. तसेच महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी या दौऱ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले.



या दौऱ्यादरम्यान दुपारी २.०० वाजता श्री गणेश मंगल कार्यालय, पारनेर येथे एस.आय.आर. संदर्भातील शासकीय आढावा बैठक, ३.०० वाजता पारनेर येथे त्याच ठिकाणी टंचाईबाबत आढावा बैठक, तसेच सायंकाळी ४.०० वाजता गांजी भोयरे ते पांढरे वस्ती रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे १४२.३९ लक्ष कामाचे भूमिपूजन आणि सायंकाळी ५.०० वाजता कुकडी डावा कालव्याच्या उर्वरीत दुरुस्ती करणे १६७.६६ कोटी कामांचे भूमि पूजन पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

याबाबत आमदार काशिनाथ दाते म्हणाले, पारनेर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध आहे. पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दौऱ्यातून अनेक महत्त्वाच्या विकासकामांना चालना मिळणार असून, भविष्यातही तालुक्याच्या विकासासाठी आवश्यक निधी व योजना उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील. हा दौरा पारनेरच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

यावेळी आमदार दाते यांनी महायुतीचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विकासकामांचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन केले.

# काकडे व पुरनाळे कुटुंबाने स्व-हितापेक्षा समाज हिताला प्राधान्य दिले : आमदार कोल्हे

### 'काकडे शैक्षणिक संकुला'च्या गणेशनगर कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस'नामकरण; 'युवाशक्ती Cric करंडक क्रिकेट' स्पर्धेचे उद्घाटन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

सार्वजनिक कामे, पाणी चळवळ आणि समाजसेवेसह शैक्षणिक क्षेत्रात मोठे योगदान देणारे कुटुंब म्हणून काकडे कुटुंबाची ओळख आहे. काकडे व पुरनाळे कुटुंबाने स्वहितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिल्याचा इतिहास चिरकाल स्मरणात राहणारा आहे. पूर्वजांनी प्रतिकूल परिस्थितीला ज्या धैर्याने सामोरे जाऊन समाजकारणाचा आदर्श निर्माण केला, त्यातून आजच्या पिढीला प्रेरणा मिळते. राज्य व राष्ट्राचे भविष्य घडवायचे असेल, तर इतिहासाची पाने उलगडून पाहण्याची गरज आहे. आजची 'जनरेशन–झेड' (Gen-Z) राजकारणापासून दूर गेलेली नसून ती अधिक जागरूक आणि सतर्क झाली आहे. त्यामुळे या पिढीला योग्य दिशा देणे आवश्यक असून तरुणाईने नवीन तंत्रज्ञान आत्मसात करून शालेय जीवनापासूनच कौशल्यविकासावर भर द्यावा, असे प्रतिपादन विधान परिषदेचे सदस्य आमदार विवेक कोल्हे यांनी केले.

कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शेवगाव स्थित गणेशनगर येथील कॅम्पसचे 'डॉ. त्रिंबकराव पुरनाळे कॅम्पस (DTP Campus)' असे नामकरण आणि 'युवाशक्ती ऊीळल करंडक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन आमदार कोल्हे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष ॲड.शिवाजीराव काकडे, जिल्हा परिषदेच्या माजी सभापती हर्षदा काकडे, विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे, जगन्नाथ गावडे,भगूरचे सरपंच वैभव पुरनाळे,रामजी पोटफोडे,प्रमोद तांबे,लहू जायभाये आदि उपस्थित होते.

उपस्थित युवकांना मार्गदर्शन करताना आमदार कोल्हे म्हणाले, आपल्याकडे असलेल्या वेळेचा सदुपयोग करणे आवश्यक आहे. जगात सर्वाधिक स्क्रीन टाइम घालवणारा देश म्हणून भारताची ओळख निर्माण झाली आहे. युनिसेफच्या अहवालानुसार देशातील सुमारे ३८ टक्के विद्यार्थी ताण–तणावाखाली आहेत. त्यामुळे स्व–विकासासाठी मोबाईलचा जबाबदारीने वापर करणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या युगात प्रत्येकाने योग्य आदर्श डोळ्यासमोर ठेवून स्वतःचे जीवन सक्षमपणे घडवावे.

दिवंगत माजी मंत्री शंकरराव कोल्हे आणि डॉ. त्रिंबकराव पुरनाळे यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध होते. या दोन्ही परिवारांना समाजकारण, राजकारण आणि लोकचळवळीचा समृद्ध वारसा लाभला आहे. तरुण एकत्र आले की परिवर्तन घडते, हे इतिहासाने सिद्ध केले आहे. समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी युवकांचे संघटन निर्माण होणे गरजेचे आहे. त्याच भावनेतून तालुक्यातील युवकांच्या भेटी घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेणे आणि त्यांचे निराकरण करण्याचा मी सातत्याने प्रयत्न करत आहे. युवकांमध्ये क्रीडाभावना वाढावी या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आल्याचे आयोजक कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाचे विश्वस्त पृथ्वीसिंह काकडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शेवगाव व पाथर्डी तालुक्यातील एकूण २७ संघ या पाच दिवसीय 'युवाशक्ती ऊीळल करंडक' क्रिकेट स्पर्धेत सहभागी झाले आहेत. स्पर्धेचे नेटके नियोजन आणि उत्साहवर्धक वातावरण पाहून युवकांमध्ये विशेष उत्साह संचारल्याचे दिसून आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.लक्ष्मणराव बिटाळ यांनी केले.



### 'ताजनापूर' योजनेसाठी माझे पूर्ण सहकार्य : आमदार कोल्हे

ॲड. शिवाजीराव काकडे यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी 'ताजनापूर' योजनेला शासनाचे सहकार्य लाभत आहे. या योजनेच्या कामासाठी जिथे माझी आवश्यकता भासेल, तिथे मी स्वतः उपस्थित राहून सर्वतोपरी सहकार्य करेन, अशी ग्वाही आमदार विवेक कोल्हे यांनी दिली.

# माझं गाव - आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत ऑगस्ट महिन्यात विविध आरोग्य जनजागृती उपक्रमांचे आयोजन

## कुष्ठरोग, नेत्ररोग व हत्तीरोग प्रतिबंधासाठी विशेष मोहीम; नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा – मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र शासनाच्या माझं गाव – आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात माहे ऑगस्ट २०२६ दरम्यान विविध आरोग्यविषयक जनजागृती, प्रतिबंधात्मक उपाययोजना, रोगनियंत्रण कार्यक्रम तसेच ग्रामस्तरावरील आरोग्यविषयक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार आहेत. प्रत्येक गाव स्वच्छ, निरोगी, रोगमुक्त आणि आरोग्यदृष्ट्या सक्षम व्हावे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश असून ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका, आरोग्य कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि ग्रामस्थ यांच्या सक्रिय सहभागातून ही मोहीम जिल्हाभर राबविण्यात येणार आहे.

ही मोहीम जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असून, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या अधिपत्याखाली आरोग्य विभागामार्फत सर्व तालुक्यांमध्ये नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यात येत आहे.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव म्हणाले, निरोगी गाव हेच सक्षम आणि समृद्ध समाजाचे आधारस्थान आहे. 'माझं गाव – आरोग्य संपन्न गाव' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकापर्यंत प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा, जनजागृती आणि वेळेवर उपचार पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे. ग्रामपंचायत, आरोग्य यंत्रणा आणि ग्रामस्थ यांच्या सामूहिक सहभागातून हे अभियान अधिक प्रभावी होईल. प्रत्येक नागरिकाने आरोग्य तपासणी, लसीकरण, स्वच्छता आणि रोगप्रतिबंधक उपायांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन आपल्या गावाला आरोग्यदृष्ट्या सक्षम बनवावे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, या अभियानाअंतर्गत रोगांचे लवकर निदान, जनजागृती, नियमित आरोग्य तपासणी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर विशेष भर दिला जाणार आहे.



गावागावांत आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून नागरिकांशी थेट संवाद साधून आरोग्यविषयक माहिती दिली जाणार असून संशयित रुग्णांची वेळेत तपासणी व उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे.

ऑगस्ट २०२६ मधील प्रमुख उपक्रम

१. तालुकास्तरीय 'आरोग्य संपन्न गाव' कृती दल समिती बैठक

सर्व तालुक्यांमध्ये कृती दल समितीच्या बैठका आयोजित करून अभियानाचा आढावा, आरोग्यविषयक उद्दिष्टे, प्रगती तसेच विविध उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे.

२. ग्रामपंचायतस्तरीय कृती दल समिती बैठक

प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये समितीची बैठक घेऊन गावातील आरोग्यविषयक प्रश्न, स्वच्छता, पोषण, माता–बाल आरोग्य, लसीकरण, संसर्गजन्य रोगांचे प्रतिबंध आणि जनजागृती कार्यक्रमांचे नियोजन करण्यात येणार आहे.

३. कुष्ठरोग जनजागृती व संशयित रुग्णांचा सक्रिय शोध

कुष्ठरोग हा पूर्णपणे उपचारयोग्य आजार असून वेळेवर निदान व उपचार झाल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो. त्वचेवर न खाज येणारे, न दुखणारे बधीर चट्टे, संवेदनाशून्य डाग, हात–पाय सुन्न होणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात तपासणी करून उपचार सुरू करावेत. समाजातील कुष्ठरुग्णांबाबत कोणताही भेदभाव न करता त्यांना सन्मानाने वागणूक देण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

४. नेत्ररोग जनजागृती अभियान (२५ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर २०२६)

या कालावधीत मोतीबिंदू, काचबिंदू, दृष्टीदोष, मधुमेहामुळे होणारे नेत्रविकार तसेच डोळ्यांच्या आरोग्याबाबत व्यापक जनजागृती केली जाणार आहे. विशेष तपासणी शिबिरे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि आवश्यकतेनुसार उपचारासाठी संदर्भ सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. नागरिकांनी नियमित नेत्रतपासणी करून आवश्यक उपचार घ्यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

५. १६ ते ३१ ऑगस्ट – हत्तीरोग (फायलेरिया) शोध मोहीम

या कालावधीत हत्तीरोगाच्या संशयित रुग्णांचा सक्रिय शोध घेऊन त्यांची तपासणी, निदान व उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे. पाय किंवा हाताला असामान्य सूज, वारंवार ताप किंवा इतर संबंधित लक्षणे दिसून आल्यास नागरिकांनी तात्काळ जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा.

या अभियानाला यशस्वी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आरोग्य विभागाला सक्रिय सहकार्य करावे. आशा स्वयंसेविका, अंगणवाडी सेविका किंवा आरोग्य कर्मचारी आपल्या घरी भेट देत असल्यास त्यांना आवश्यक माहिती द्यावी. वेळेवर आरोग्य तपासणी करून आवश्यक उपचार घ्यावेत तसेच स्वच्छता, संतुलित आहार, नियमित व्यायाम, लसीकरण आणि रोगप्रतिबंधक उपायांचा अवलंब करून आपल्या गावाला आरोग्य संपन्न गाव बनविण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा.

# छत्रपती शिवराय म्हणजे संस्कार आणि शौर्याचा इतिहास : शिवव्याख्याते विनायक खोत

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

स्व.वैभवदादा विजयराव देशमुख प्रतिष्ठानचा वतीने स्व वैभवदादा यांचा स्मृतिदिना निमित्त शालेय विद्यार्थ्यांसाठी शिवराय घडताना या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.छत्रपती शिवरायांचे बालपण, त्यांच्या वर झालेले संस्कार आणि त्याचा आजचा विध्यार्थ्यांचा जीवनातील आदर्श यावर या व्याख्यानात शिवनेरभूषण विनायक खोत यांनी प्रकाश टाकला.विनायक खोत यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीतून शिवरायांचा जडणघडणी चा प्रवास विध्यार्थ्या समोर जिवंत केला.

ते म्हणाले, शिवराय घडण्यात राजमाता जिजाऊंचे संस्कार आणि बालपणातील शिस्त अत्यंत महत्वाची होती. आजचा विध्यार्थ्यांनी केवळ इतिहास वाचू नये, शिवरायांचे गुण,त्यांचे व्यवस्थापन कौशल्य व संकटाना सामोरे जाण्याचे धैर्य स्वतः चा जीवनात उतरवले पाहिजे. शिवरायांचा बालपणातील प्रसंगावर आधारित या व्याख्यानाने उपस्थित विध्यार्थ्यांमध्ये एक नवा उत्साह व ऊर्जा निर्माण केली.

स्व.वैभवदादा देशमुख यांचा वाढदिवसाचा निमित्ताने प्रतिष्ठानचा वतीने सामाजिक बांधिलकी जपत परिसरातील विविध शाळेतील हुशार,गरजू विद्यार्थ्यांना दहा सायकल, शंभर स्कूल बॅग व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.प्रमुख पाहुणे सुजित खैरे यांनी आपल्या भाषणात प्रतिष्ठानचा कार्याचे कौतुक करताना,ते म्हणाले, शिक्षणा पासून एकही मूल वंचित राहणार नाही,प्रतिष्ठान मार्फत सुरु असलेले हे उपक्रम समाजाला प्रेरणा देणारे असे आहेत.या सायकलीमुळे विध्यार्थ्यांचा वेळेची बचत होईल व त्यांचा शाळेत जाण्याचा उत्साह वाढेल. याप्रसंगी प्रतिष्ठानचावतीने स्व.वैभवदादा देशमुख यांचा वाढदिवसाचा निमित्त भाम काई देवराई प्रकल्प मांदारने येथे वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रदीप गाढवे,नितिन पाटील,मंगेश डुंबरे,मेघनाताई देशमुख, वैजयंती झुंजारराव,,दीपक डुंबरे,सुशील हिगणे,रोहिदास



डुंबरे,किशोर कवडे,प्रवीण देशमुख,मधुकर हुलवळे,भूषन् देशमुख,स्वप्नील देशमुख, अनिल डुंबरे राजू काकडे,राजू भनगडे,नितीन डुंबरेगीतांजली डुंबरे,रत्ना शिरसाठ,प्रदीप सूर्यवंशी,मुख्याध्यापक प्रतिक अकोलकर,प्रतिष्ठानचे सर्व सदस्य,शिक्षक,विद्यार्थी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मिलिंद खेत्री,भाऊसाहेब खाडे यांनी केले तर आभार पोपट नलावडे यांनी मानले.

> **प्रतिष्ठान मार्फत शैक्षणिक पालकत्व उपक्रम अंतर्गत रिद्धी भालेराव या होतकरू व गरजू मुलीचा पुढील शिक्षणा ची जबाबदारी स्वीकारत तिचा शिक्षणासाठी ६२000/– हजार रुपये निधी प्रतिष्ठान मार्फत प्रदान करण्यात आला**

# दहा कोटी नशामुक्त महाअभियान

# प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय व स्नेहालयाचा उपक्रम



**पारनेर (समर्थ गांवकरी)**

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय सेंटर व स्नेहालय संचलित उडान प्रकल्प अंतर्गत नुकतेच दहा कोटी नशामुक्त महाअभियान मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात शालेय स्तरापासूनच विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीविषयी जनजागृती निर्माण करण्याचे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. सादिक राजे यांनी, शालेय स्तरावर व्यसनमुक्तीविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती झाल्यास सुदृढ व व्यसनमुक्त समाज निर्माण होईल, असा मोलाचा संदेश दिला.

आजची युवा पिढी विविध व्यसनांच्या आहारी जात असताना, त्यांना या मार्गापासून दूर ठेवण्यासाठी हे महाअभियान अत्यंत स्तुत्य आणि काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, आमची शाळा या देशव्यापी अभियानात पूर्ण जोमाने सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी नेहमी कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला पारनेर परिसरातील अनेक प्रतिष्ठित नागरिक व तज्ज्ञ उपस्थित होते. यात प्रामुख्याने ब्रह्माकुमारी साधना दिदी (संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, पारनेर सेंटर), डॉ. सादिक राजे, संभाजी मगर (उद्योजक),मीरा पुजारी (योग शिक्षिका),ड. शिवाजीराव जाधव,राम भाई, पत्रकार भगवान गायकवाड (स्नेहालय संस्था), देवराम खोडदे, हिराबाई मगर, अरुणा औटी,यांसारख्या अनेकविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहून या अभियानाला पाठिंबा जाहीर केला.

ब्रह्माकुमारी साधना दिदींचे प्रास्ताविक व अभियानाची रूपरेषा प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ब्रह्माकुमारी साधना दिदी यांनी प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या माध्यमातून देशभरात सुरू असलेल्या 'नशामुक्त भारताच्या' कार्याची सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, पारनेर तालुक्यात 'दहा कोटी नशामुक्त महाअभियान' व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

या अभियानांतर्गत समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचून जनजागृती केली जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने खालील उपक्रमांचा समावेश असणार आहे शाळा, उच्च माध्यमिक विद्यालय आणि महाविद्यालयांमध्ये विशेष प्रबोधन सत्रे आयोजित करणे, विविध सामाजिक संस्था, पोलीस स्टेशन व ग्रामपंचायतींच्या माध्यमातून जनजागृतीपर कार्यक्रम राबवणे., गावोगावच्या चौकाचौकात फलक लावून आणि व्याख्यानांच्या माध्यमातून व्यसनाचे दुष्परिणाम लोकांसमोर मांडणे.व्यसनमुक्त समाजाची गरज आजच्या धावपळीच्या युगात आणि आधुनिक जीवनशैलीत तरुणाई व्यसनांच्या विळख्यात अडकत चालली आहे, जी मानवी आरोग्यासाठी आणि देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत घातक आहे. यावर मात करण्यासाठी केवळ कायदे किंवा पोलिसांची कारवाई पुरेशी नाही, तर तळागाळातील लोकांमध्ये आणि विशेषतः शालेय विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर नैतिक मूल्यांचे संस्कार करणे गरजेचे आहे. विद्यार्थी हा देशाचाभावी नागरिक असल्याने, त्याचे बालपण आणि विद्यार्थी दशा व्यसनमुक्त राहिल्यास, भविष्यात संपूर्ण समाज आणि देश व्यसनमुक्त होण्यास नक्कीच मदत होईल, असा सूर या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी पारनेर तालुका आणि देश व्यसनमुक्त करण्यासाठी शपथ घेतली व या महाअभियानात हिरिरीने सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# श्रीगोंदा पोलिसांनी घेतली व्यापारी असोसिएशनची बैठक; डीजे, कर्णकर्कश बँड, फटाके आणि बुलेटच्या आवाजावर होणार कडक कारवाई

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

शहरातील शांतता, सुव्यवस्था आणि नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य देत श्रीगोंदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापारी असोसिएशनची विशेष बैठक पोलीस स्टेशनमध्ये पार पडली. शहरात वाढत चाललेल्या ध्वनीप्रदूषणाबाबत व्यापाऱ्यांनी तीव्र चिंता व्यक्त करत पोलिसांना विविध सूचना दिल्या तसेच मागण्यांचे निवेदन सादर केले. व्यापाऱ्यांच्या सूचनांची प्रशासनाने गंभीर दखल घेत नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर तात्काळ आणि कडक कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला.

बैठकीत व्यापाऱ्यांनी सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका आणि उत्सवांमध्ये



वाढत्या ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांना विशेषतः ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर पोलिसांनी खालील महत्त्वाचे निर्णय जाहीर केले.

बैठकीतील प्रमुख निर्णय

सार्वजनिक कार्यक्रम किंवा मिरवणुकांमध्ये डीजे वाजवण्यास परवानगी दिली जाणार नाही.

आवाजाची मर्यादा ओलांडून कर्णकर्कश ध्वनी निर्माण करणाऱ्या बँड चालकांवर गुन्हे दाखल केले जातील.

रात्री मोठ्या आवाजाचे फटाके फोडून शांतताभंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शाळा, महाविद्यालय परिसर तसेच मुख्य बाजारपेठेत सायलेन्सर बदलून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या बुलेट चालकांविरोधात विशेष मोहीम राबवून सायलेन्सर जप्त केले जातील आणि दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई केली जाईल.

बैठकीत शहरातील सुरक्षाव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी व्यापाऱ्यांनी पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेरा उपलब्ध करून देण्याचा निर्णयही घेतला. एक कॅमेरा पोलिसांसाठी या उपक्रमांतर्गत व्यापारी संघटनेकडून हा कॅमेरा देण्यात येणार आहे.

पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी शहरात शांतता राखणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे सांगितले. व्यापारी बांधवांनी प्रशासनाला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले असून नागरिकांनी ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक नियमांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

# तामसा शहरात अल्पवयीनांकडून दुचाकी चालविण्याचे प्रमाण वाढले; नागरिकांकडून कारवाईची मागणी

**तामसा (समर्थ गांवकरी)**

तामसा शहरात अल्पवयीन मुलांकडून दुचाकी आणि चारचाकी वाहने भरधाव वेगाने चालविण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन, स्टंटबाजी, ट्रिपल सीट, हेल्मेटचा वापर टाळणे तसेच मोबाईलवर बोलत वाहन चालविणे यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

विशेषतः शाळा, महाविद्यालये, खासगी शिकवणी वर्ग तसेच मुख्य बाजारपेठ परिसरात सकाळी व दुपारी विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. या काळात अनेक अल्पवयीन विद्यार्थी दुचाकींवर ट्रिपल सीट प्रवास करताना, मोठ्या आवाजात हॉर्न वाजविताना आणि वेगाने वाहने चालविताना दिसून येतात. यामुळे पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

मोटार वाहन कायद्यानुसार अल्पवयीनांना वाहन चालविण्यास परवानगी नसतानाही अनेक पालक आपल्या मुलांच्या हाती वाहने देत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे पालकांनीही जबाबदारी स्वीकारून अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास मज्जाव करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

शहरातील शाळा–महाविद्यालय परिसरात वाहतूक पोलिसांनी विशेष तपासणी मोहीम राबवून अल्पवयीन वाहनचालक, ट्रिपल सीट, स्टंटबाजी आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिक, पालक आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

नागरिकांचे म्हणणे आहे की, वेळेत कठोर पावले उचलली नाहीत तर भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यामुळे वाहतूक नियमांचे काटेकोर पालन आणि नियमित जनजागृती मोहीम राबविण्याचीही गरज व्यक्त होत आहे.

**Name Changed**

I Have Changed My Old Name Awari Parigha Dasharath To New Name Kanawade Reshma Bhaskar Adress –At –Mabad Post-Dhamangaon Awari Tal-Akole Dist-A. Nagar 422601 By Notary No - 381/ 2026 Date–21/07/2026.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३८/२०२६ अकोले दि. ०७/०८/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. किशोर भास्कर चोथवे, रा. कोतुळ,** ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांची आई कै. हिराबाई भास्कर चोथवे यांचा मृत्यू दि. १०/१२/२०२४** रोजी **मौज कोतुळ** येथे झाला असुन त्यांच्या **आईच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय कोतुळ,** ता.अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. किशोर भास्कर चोथवे, रा. कोतुळ,** ता.अकोले जि.अहिल्यानगर **अर्जदार यांची आई कै. हिराबाई भास्कर चोथवे यांचा मृत्यू दि. १०/१२/२०२४** रोजी **मौज कोतुळ** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय कोतुळ,** ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०७/०८/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**कामगिरी क्लर्क** **तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

**जाहीर पेपर नोटीस**

**तहसिलदार तथा दंडाधिकारी अकोले, जि. अहिल्यानगर**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/३८/२०२६ अकोले दि. ०७/०८/२०२६

१) एजाज मोहमद शेख, रा. लिंगदेव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

**विरुध्द....**१. अहंमद बनेमिया शेख अ.पा.क. किसुमबी बनेमिया,

२. चंद्रभागा गजानन फापाळे (मयत) वारस १. देविदास गजानन फापाळे, २. शिवाजी गजानन फापाळे, ३. जिजाबाई रंगनाथ लांडगे,

३. हरिदास गजानन फापाळे (मयत) वारस १. सुशिला हरिदास फापाळे, २. संदिप हरिदास फापाळे, ३. सोमनाथ हरिदास फापाळे, ४. मनिषा राजु ठोंबाडे, रा. इंदोरी, ता. अकोले, जि. अ.नगर, ५. जयश्री सुनिल आंबरे, रा. गणोरे, ता. अकोले, जि. अ.नगर,

४. मच्छिंद्र जिजाबा फापाळे, ५. सुनिल जिजाबा फापाळे व इतर रा. लिंगदेव, ता. अकोले, जि. अहिल्यानगर

या नोटीसाद्वारे कळविणेत येते की, अर्जदार श्री. एजाज मोहमद शेख, रा. लिंगदेव, ता, अकोले, यांनी मौजे लिंगदेव येथिल जुना स.नं. १६९/१, १६९/४ चा नविन स.नं. १४५/१२, १४५/२ या जमिनीवरील वारस फेरफार नं १०२८ नुसार एकत्र कुटुंब कर्ताची इतर वारसांची कब्जेदार सदरी नोंद होणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

तरी अर्जदार यांनी सादर अर्जाबाबत दिनांक. १८/०८/२०२६ रोजी तहसिल कार्यालय अकोले येथे सकाळी ११.०० वाजता सुनावणी ठेवणेत आलेली आहे. आपणाकडे उपलब्ध कागदपत्रासह सदर दिनांकास आपण उपस्थित रहावे. सदर दिनांकास आपण उपस्थित न राहिल्यास याबाबत आपले काहीएक म्हणणे नाही असे समजणेत येऊन गुणवत्तेवर निर्णय देणेत येईल. तसेच सदर प्रकरणात पुढील तारखेबाबत रोजनाम्यात नमुद करणेत येईल. याबाबत पुन्हा कोणताही पत्र्यव्यवहार करणेत येणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. ०७/०८/२०२६ रोजी सही व शिक्कयानिशी दिले असे.

**हुकूमावरुन,**

**तहसिलदार अकोले तथा कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.

पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे

पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ–१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे

## प्रा.बी.एच.तेलोरे यांना सावित्रीबाई फुले पुणे विदयापिठाकडून पीएच.डी. पदवी प्रदान

राजूर (समर्थ गांवकरी)



अकोले तालुक्यातील राजूर येथील सत्यनिकेतन संस्थेचे ड. एम. एन. देशमुख कला,विज्ञान व वाणिज्य म हाविद्यालयातील राज्यशास्त्र विषयाचे प्रा. बी. एच. तेलोरे यांनी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या नवसंजीवन योजनेची अंमलबजावणी व मूल्यमापन या विषयावर सखोल संशोधन करून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. प्रा. बी. एच. तेलोरे यांनी आपल्या संशोधनामध्ये नवसंजीवन योजनेच्या माध्यमातून आदिवासी सम ाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांचा अभ्यास केला. तसेच योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी, लाभार्थ्यांवरील परिणाम, प्रशासनिक कार्यपद्धती आणि योजनेची परिणाम कारकता यांचे सखोल मूल्यमापन केले.

प्रा. बी. एच. तेलोरे यांनी या यशाचे श्रेय आपल्या संशोधन मार्गदर्शक प्रो. डॉ. सुरेश देवरे व प्राचार्य डॉ. विलास आवारी ,वडील कै. हरिदास तेलोरे व कुटुंबीय, सहकारी तसेच संशोधन कार्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संबंधितांना दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे सत्यनिकेतन संस्थेचे अध्यक्ष ॲड.मनोहरराव देशमुख,सचिव एम.एल. मुठे, कोषाध्यक्ष विवेकजी मदन, माजी सचिव तथा प्राचार्य टी. एन. कानवडे,संचालक प्रकाश टाकळकर, एस.टी.येलमामे,विजय पवार,सत्यनिकेतन संस्थेचे सर्व संचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. भाऊसाहेब देशमुख व सर्व सहकारी प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## पारनेर-टाकळी ढोकेश्वर मार्गावर सोबलेवाडी दरम्यान संरक्षक कठडे नसल्याने रस्ता ठरतोय धोकादायक

**तलाव व स्मशानभूमी परिसरात सुरक्षेच्या उपाययोजनांची मागणी; सुनिताताई सोबले यांचे बांधकाम विभागाला निवेदन**



पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर–टाकळी ढोकेश्वर मार्गावरील सोबलेवाडी येथील खंडोबा मंदिर ते तलाव परिसरादरम्यान नुकताच डांबरी रस्ता तयार करण्यात आला असला, तरी रस्त्यालगत आवश्यक त्या साईड पट्ट्या आणि संरक्षक कठडे नसल्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या सुनिताताई सोबले यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता, पारनेर यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनात म्हटले आहे की, सोबलेवाडी येथील तलाव व स्मशानभूमी लगतच्या भागात रस्त्याच्या कडेलाच खोल खड्डा असून वाहनांना बाजू देण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नाही. अनेक ठिकाणी संरक्षक कठडे नसल्यामुळे भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. सकाळी व सायंकाळी फिरण्यासाठी या मार्गाचा वापर करणाऱ्या ग्रामस्थांनाही जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्रामस्थांनी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आवश्यक त्या प्रमाणात साईड पट्ट्या तयार कराव्यात, तलाव, स्मशानभूमी परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूने खोल खड्डे असलेल्या धोकादायक ठिकाणी मजबूत संरक्षक कठडे उभारावेत, तसेच आवश्यक त्या ठिकाणी इशारा फलक, रिफ्लेक्टर व सुरक्षा चिन्हे बसवावीत, अशी मागणी केली आहे.

## तामसा येथे डेंग्यूसदृश्य आजाराने बालक दगावला

तामसा (समर्थ गांवकरी)



डेंग्यू सदृश्य आजाराने एक चार वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दि. ६ रोजी गुरुवारी सकाळी घडली असून नागरिकांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शुभम रुपेश कोरे वय ४ वर्षे असे मृत्यू झालेल्या बालकाचे नाव आहे. तामसा शहरातील वॉर्ड क्रमांक ५ मधील तो रहिवाशी असून मागील चार ते पाच दिवसापासून तो तापीने फणफणत होता. घरची परिस्थिती खूप गरीब असल्याने शुभमला त्यांनी शहरातील खाजगी दवाखान्यात उपचार सुरु केले होते. परंतु उपचार सुरु असतानाच त्याची तब्येत अचानक बिघडली आणि त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. बालकाच्या दुर्दैवी मृत्यूमुळे कोरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून अत्यंत शोकाकुल वातावरण त्यावर येथील स्म शानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. शुभम हा आई वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता आरोग्य विभागाने तामसा शहरात तात्काळ विशेष वैद्यकीय पथक तैनात करून घरोघरी आरोग्य सर्वेक्षण करावे, संपूर्ण शहरात धूर व डासप्रतिबंधक औषधांची फवारणी करावी व प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक औषधसाठा उपलब्ध करून द्यावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

# शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला व चलॉजिस्टिक पार्कची मागणी

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे खासदार नीलेश लंके यांची मागणी

### नगर – मनमाड रस्त्याच्या कामाला गती देण्याचाही आग्रह

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

जिल्ह्यातील सुरत–चेन्नई राष्ट्रीय म हामार्गामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने न्याय्य मोबदला मिळावा तसेच नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील परिसरातील सुमारे १ हजार एकर शासकीय जमिनीवर लॉजिस्टिक पार्क अथवा एमआयडीसीच्या धर्तीवर औद्योगिक प्रकल्प उभारण्यात यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी खासदार डॉ. निलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात खासदार लंके यांनी नमूद केले आहे की, सुरत–चेन्नई राष्ट्रीय महामार्गासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेमुळे अनेक शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर महामार्गाची नोंद झाली असून त्यामुळे कर्जप्रकरणे, जमीन खरेदी–विक्री, वाटणी तसेच इतर आर्थिक व्यवहार ठप्प झाले आहेत. अनेक बाधित शेतकऱ्यांना अद्यापही योग्य मोबदला मिळालेला नसल्याने त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

महामार्गग्रस्त शेतकऱ्यांच्या जमिनींसह घरे, विहिरी, गोठे, झाडे व इतर स्थावर मालमत्तेचे पारदर्शक पद्धतीने योग्य मूल्यांकन करून त्यांना तातडीने न्याय्य मोबदला देण्याची मागणीही त्यांनी केली आहे. याशिवाय नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील परिसरातील सुमारे १,००० एकर शासकीय जमीन औद्योगिक विकासासाठी वापरून तेथे लॉजिस्टिक पार्क किंवा एम आयडीसीच्या धर्तीवर औद्योगिक प्रकल्प उभारल्यास अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित होईल आणि हजारो युवक–युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील, असेही खासदार लंके यांनी निवेदनात नमूद केले आहे. दरम्यान, नगर–मनमाड रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरु असल्याबद्दलही त्यांनी केंद्रीय मंत्री गडकरी यांचे लक्ष वेधले. अनेक वर्षांपासून या रस्त्याची दुरवस्था झाली असून वारंवार अपघात होत असल्याने संबंधित यंत्रणेला निर्देश देऊन हे काम दर्जेदार व जलद गतीने पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली.



महामार्गग्रस्त शेतकऱ्यांना न्याय्य मोबदला, नगर–मनमाड रस्त्याच्या कामाला गती आणि चिचोंडी पाटील येथे औद्योगिक प्रकल्प उभारणी या तिन्ही विषयांवर केंद्र सरकारने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती खासदार डॉ. निलेश लंके यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

## स्वातंत्र्यानंतर प्रथमच एकराळा-कृष्णापूर-रावणगावम ध्ये धावली 'लाल परी'; नागरिकांचा जल्लोष

तामसा (समर्थ गांवकरी)

हदगाव तालुक्यातील एकराळा, कृष्णापूर आणि रावणगाव या गावांमध्ये स्वातंत्र्यानंतर प्रथमच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) बस सेवा सुरू झाल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही मागणी अखेर पूर्ण झाल्याने नागरिकांनी जल्लोष साजरा करत एसटी बसचे उत्स्फूर्त स्वागत केले.



या गावांमध्ये यापूर्वी नियमित एसटी सेवा नसल्यामुळे विद्यार्थी, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक आणि रुग्णांना खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. आता लाल परी गावात दाखल झाल्याने दळणवळणाची मोठी सोय उपलब्ध झाली असून शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ व शासकीय कामांसाठी नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ही बस सेवा सुरू करण्यासाठी सखाराम बाउलकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने ग्राम स्थांनी त्यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले. बस गावात पोहोचताच फटाक्यांची आतषबाजी, पुष्पवृष्टी आणि जल्लोषात तिचे स्वागत करण्यात आले. ग्रामस्थांनी एसटी महामंडळाचे वाहतूक नियंत्रक, चालक, वाहक तसेच या सेवेसाठी प्रयत्न करणाऱ्या सर्व संबंधितांचे आभार मानत ही बस सेवा नियमित सुरू ठेवण्याची मागणी केली आहे. अनेक दशकांपासून वाहतूक सुविधेपासून वंचित असलेल्या या गावांसाठी हा दिवस ऐतिहासिक ठरल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

## मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांची वज्रेश्वरी व अनगाव प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेट

**पंचायत समिती भिवंडी येथे आरोग्य सेवा, SLWM Rules-2026 व घरकुल योजनांच्या कामांचा घेतला आढावा**

ठाणे (समर्थ गांवकरी)



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी दि. ०६ ऑगस्ट २०२६ रोजी वज्रेश्वरी व अनगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायत वज्रेश्वरी तसेच पंचायत समिती भिवंडी येथे भेट देऊन विविध विकासकामे व शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यावेळी आरोग्य सेवा, ग्राम पंचायतस्तरीय कामकाज, प्रादेशिक पाणीपुरवठा योजना, ड्डथच् ठीश्रशी–२०२६ तसेच घरकुल योजनांच्या प्रगतीबाबत संबंधित अधिकारी–कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी सर्वप्रथम प्राथमिक आरोग्य केंद्र, वज्रेश्वरी येथे भेट देऊन बाह्यरुग्ण विभाग, प्रयोगशाळा, औषध भांडार, लसीकरण कक्ष, प्रसूती कक्ष आदी विविध विभागांची पाहणी केली. यावेळी रुग्णांना देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवा, औषधांचा उपलब्ध साठा, कर्मचारी उपस्थिती तसेच आरोग्य केंद्रातील स्वच्छतेचा आढावा घेण्यात आला. नागरिकांना वेळेत व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य केंद्रातील सर्व सुविधा कार्यक्षम ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या.

यानंतर ग्रामपंचायत वज्रेश्वरी येथे भेट देऊन ग्रामपंचायतीच्या विविध दप्तरांची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करून दप्तर अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वज्रेश्वरी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेचा आढावा घेण्यात आला. योजनेची प्रभावी अंमलबजावणी तसेच पाणीपट्टी वसुली वाढविण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिल्या.

वज्रेश्वरी हे प्रसिद्ध पर्यटनस्थळ असल्याने परिसरातील स्वच्छता व कचरा व्यवस्थापनाला विशेष महत्त्व देण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी SLWM Rules-2026 ची प्रभावी अंमलबजावणी करून घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाची योग्य व्यवस्था निर्माण करण्याचे निर्देश देण्यात आले.

## पारनेर नगरपंचायत अंतर्गत ४५ लाखांचा रस्ता निकृष्ट; सुनीताताई सोबले यांची चौकशीची मागणी

**बीएसएनएल ऑफिस ते विधाटे वस्ती रस्त्याच्या दर्जावर प्रश्नचिन्ह; सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन**

पारनेर (समर्थ गांवकरी)

पारनेर नगरपंचायत हद्दीतील बीएसएनएल ऑफिस ते विधाटे वस्ती या रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या काम ाची तात्काळ चौकशी करून रस्ता दुरुस्त करावा, तसेच संबंधित काम पूर्ण झाले आहे की अपूर्ण, याबाबत नगरपंचायतीने लेखी खुलासा करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुनीताताई सोबले यांनी पारनेर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.



निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या रस्त्याच्या डांबरीकरणासाठी सुमारे ४५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र काम पूर्ण झाल्यानंतर अल्पावधीतच रस्त्याची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचे दिसून आले आहे. अनेक ठिकाणी रस्ता उखडलेला असून काही भागातील काम अपूर्ण असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे कामाच्या दर्जाबाबत नागरिकांमध्ये गंभीर शंका निर्माण झाली आहे.

हा रस्ता परिसरातील नागरिक, महिला, शेतकरी तसेच वाहनधारक मोठ्या प्रमाणावर वापरत असल्याने निकृष्ट कामामुळे दैनंदिन वाहतुकीत अडचणी निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे संबंधित कामाची तातडीने तांत्रिक तपासणी करून दोषी आढळणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, तसेच रस्ता दर्जेदार पद्धतीने दुरुस्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महिला व ग्रामस्थांच्या सहभागातून लोकशाही मार्गाने उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सुनीताताई सोबले यांच्यासमवेत जयश्री शेरकर, उज्वला विधाटे, स्वाती वैद्य, छाया वैद्य, सुनिता विधाटे आणि लता विधाटे उपस्थित होत्या.

## सफाई कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला; आरोपींना तत्काळ अटक करण्यासाठी बेमुदत कामबंद आंदोलनाचा इशारा

**नगर परिषद कर्मचारी/सफाई कर्मचारी संघटनेचे पोलीस निरीक्षकांना निवेदन; दोषींवर कठोर कारवाईची मागणी**



किनवट (समर्थ गांवकरी)

किनवट नगर परिषदेत कार्यरत सफाई कर्मचारी व्यंकटेश भुनेपल्लीवार यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ नगर परिषद कर्मचारी/सफाई कर्मचारी संघटनेने गुरुवारी पोलीस निरीक्षक, किनवट यांना निवेदन सादर केले. आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, अन्यथा ६ ऑगस्ट २०२६ पासून बेमुदत कामबंद आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

निवेदनानुसार, ५ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ९.४८ वाजता नगर परिषदेचे कर्मचारी व्यंकटेश भुनेपल्लीवार हे कोंडवाडा येथे सेवेत असताना काही व्यक्तींनी कुलूप तोडून जनावरे सोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आली. या घटनेत कर्मचारी गंभीर जखमी झाल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

या प्रकरणात दोषींवर तत्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी द्यावी आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

या निवेदनावर संघटनेचे अध्यक्ष अल्ताफ अ. गफूर आणि सचिव सुरेश शंकर पुलकुंडवार आणि सर्व नगरपरिषदेचे कर्मचाऱ्यांची स्वाक्षरी आहेत

## नेवासा जिल्हा परिषद शाळेमध्ये राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियानाचा शुभारंभ

**नशामुक्ती अभियानाचा उद्देश विषद करून सामूहिक प्रतिज्ञाद्वारे केली जनजागृती**

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा खुर्द येथील जिल्हा परिषद सेमी इंग्लिश शाळेमध्ये दि.६ ऑगस्ट ते २० ऑगस्ट या कालावधीत देशभर राबविण्यात येत असलेल्या राष्ट्रीय नशामुक्ती जनजागृती अभियानाचा शुभारंभ नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल यांच्या हस्ते व प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय नेवासा येथील ओम शांती केंद्राच्या राजयोगिनी वंदना दिदी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी भावी पिढीसमोर नशामुक्ती अभियानाचा उद्देश विषद करून सामूहिक प्रतिज्ञाद्वारे जनजागृती करण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी गटविकास अधिकारी संजय लखवाल,राजयोगिनी वंदना दिदी, केंद्रप्रमुख बाळासाहेब काशीद,मुख्याध्यापक असिफ शेख सर,मच्छिंद्र देठे,शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य पत्रकार सुधीर चव्हाण,अर्जुन धानापुणे,कु.साक्षी लहिरे, वैभव चव्हाण प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक असिफ शेख सर यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.

यावेळी नशामुक्ती अभियानाचा शुभारंभ प्रमुख मान्यवरांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आल्यानंतर उपस्थित शेकडो विद्यार्थ्यांना नशामुक्ती जनजागृतीसाठी मी देखील यासाठी खारीचा वाटा उचलेन अशी सामुदायिक प्रतिज्ञा करण्यात आली

यावेळी बोलतांना ओम शांती केंद्राच्या राजयोगिनी वंदना दिदी म्हणाल्या की आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांच्या संकल्पनेनुसार देशात दहा करोड लोकांची नशामुक्ती करायची हे उदिष्ट या अभियानाचे असून माउंट अबू येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने देशभर दीदींनी व भाईंनी नशामुक्ती अभियानात जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतला आहे या अभियानाला चळवळ बनवा असे आवाहन यावेळी करण्यात आले.

गटविकास अधिकारी संजय लखवाल म्हणाले की नशा ही लागलेली कीड असून यामुळे व्यसनी माणसाचे सर्व कुटुंब उध्वस्त होते.या अभियानाद्वारेव्यसनांपासून मुक्त होण्याचा संदेश आपल्याला द्यायचा आहे, मोबाईल हे एक व्यसनच असल्याने मुलांनी त्यापासून दूर रहाण्याचा प्रयत्न करावा,बाजारात आलेले नशायुक्त पेय हे



टाळायचे असल्याने यासाठी मुलांनी दूर रहाण्याचा संकल्प करावा असे आवाहन केले.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी शिक्षक आण्णासाहेब शिंदे,शिक्षिका सौ. सुनिता कर्जुले–राऊत, श्रीमती कामिनी बायस,श्रीमती संध्या लोंढे–नांगरे,विद्या खामकर,ज्योती गाडेकर,मिनाक्षी लोळगे,अर्चना बोकारे, अश्विनी मोरे, प्रतिभा गाडेकर यांच्यासह माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिक्षिका सुनीता कर्जुले– राऊत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तरअण्णासाहेब शिंदे यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार म

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



## थोडक्यात पण महत्त्वाचे

### प्रवेश परीक्षांमधील टक्केवारी व पर्सेंटाइल या दोन्ही संकल्पना वेग वेगळ्या आहेत

**गणोरे (समर्थ गांवकरी)**

दरवर्षी लाखो विद्यार्थी स्पर्धात्मक प्रवेश परीक्षा देतात. मात्र, टक्केवारी (Percentage) आणि पर्सेंटाइल (Percentile) या दोन्हींचा अर्थ एकच आहे असा गैरसमज अनेकदा केला जातो. या दोन्ही संज्ञा ऐकायला सारख्या वाटल्या, तरी त्या विद्यार्थ्याच्या कामगिरीचे दोन वेगवेगळे पैलू दर्शवतात.

टक्केवारी (Percentage) म्हणजे विद्यार्थ्याने एकूण गुणांपैकी किती गुण मिळवले, हे दर्शवते. म्हणजेच, निश्चित गुणांकन पद्धतीनुसार विद्यार्थ्याची वैयक्तिक कामगिरी त्यातून दिसून येते.

याउलट, पर्सेंटाइल (Percentile) हे त्या विद्यार्थ्याने त्याच परीक्षेला बसलेल्या इतर सर्व विद्यार्थ्यांच्या तुलनेत किती चांगली कामगिरी केली, हे दर्शवते. म्हणजेच, केवळ मिळालेल्या गुणांवर नव्हे, तर सर्व परीक्षार्थ्यांमध्ये त्या विद्यार्थ्याचे स्थान काय आहे, हे पर्सेंटाइलमधून समजते.

उदाहरणार्थ, अलीकडे CET परीक्षेबाबत सुरू असलेल्या चर्चांमध्ये सुमारे १,२०० विद्यार्थ्यांना बारावीच्या टक्केवारीच्या तुलनेत प्रवेश परीक्षेत खूप जास्त पर्सेंटाइल मिळाल्यामुळे विशेषतः चर्चेत आणले जात आहे.

या विद्यार्थ्यांची माहिती सार्वजनिकरित्या प्रसारित करण्यात आली आहे. मात्र, अशा आरोपांचा संबंधित विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांवर काय परिणाम होऊ शकतो, याचा पुरेसा विचार होणे आवश्यक आहे. कोणताही ठोस निष्कर्ष निघण्यापूर्वी होणाऱ्या सार्वजनिक चर्चा आणि तर्क–वितर्कांमुळे विद्यार्थ्यांवर मोठा मानसिक ताण येऊ शकतो आणि त्यांच्या मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो.

हेही लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की बारावीच्या बोर्ड परीक्षेतील गुण आणि प्रवेश परीक्षेतील कामगिरीतील असा फरक केवळ उएढ मध्येच नाही, तर गएएसह इतर स्पर्धात्मक परीक्षांमध्येही दिसून येतो. त्यामुळे कोणताही निष्कर्ष काढण्यापूर्वी या प्रकरणांचे सर्वंकष विश्लेषण करणे आवश्यक आहे.

### जामखेड नगरपरिषदेच्या सार्वजनिक



### मालमत्तेचे केले नुकसान

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

सौर ऊर्जा कंपनीच्या इलेक्ट्रिक पोलचे काम करीत असताना जामखेड नगरपरिषदेची सार्वजनिक शासकीय मालमत्ता असलेल्या भूमिगत गटरच्या पाईपलाईन व गटारीचे चेंबर फोडून अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान केल्याप्रकरणी इलेक्ट्रिकल्स ठेकेदार ए. एन. सावरे व व्यवस्थापक दत्ताजय मदने यांच्याविरुद्ध जामखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत जामखेड नगरपरिषदेचे लिपीक वलीम हंमद रशिद सय्यद (वय ४१) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि. १५ जुलै रोजी सागर टकले यांनी जामखेड नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे यांना फोनद्वारे माहिती दिली की, सौर ऊर्जेच्या इलेक्ट्रिकल्स ठेकेदार ए. एन. सावरे व व्यवस्थापक दत्ताजय मदने हे त्यांच्या कंपनीचे लाईटचे पोल बसविण्याचे काम करत असताना जामखेड शहरातील आरोळेवस्ती येथील समता तरुण मंडळ कमानीजवळ शासकीय मालमत्तेतील भूमिगत गटरची पाईपलाईन व गटारीचे चेंबर फोडत आहेत.

### मंगल भक्त सेवा मंडळाचा शिक्षण कार्यात मोठा हातभार : पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे

**१०० गरीब, गरजू, हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना**



**वह्या व शालेय दप्तर वाटप**

**टाकळी ढोकेश्वर (समर्थ गांवकरी)**

समाजात अनेक गरजू आणि होतकरू विद्यार्थी आर्थिक अडचणी मुळे शिक्षणापासून वंचित राहतात. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावणाऱ्या सेवाभावी संस्थापैकी मंगल भक्त सेवा मंडळ हे एक आहे. म्हणून या मंडळाचा अहिल्यानगर जिल्ह्यात शिक्षण कार्यात प्रत्येक वर्षी मोठा हातभार लागतो असे प्रतिपादन ढोकेश्वर विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री ढोकेश्वर विद्यालयात १०० गरीब, गरजू, हुशार व होतकरू अशा ढोकेश्वर विद्यार्थी वसतिगृहातील, आदर्श विद्यार्थी वसतिगृह तसेच बालगृहातील विदयार्थ्यांना शालेय दप्तर व वहयांचे वाटप करण्यात आले त्या प्रसंगी बाळासाहेब निवडुंगे बोलत होते.

या प्रसंगी मंडळाचे सेवेकरी बंडूनाना सप्रे, संतोष

# उद्योजक मनीष मालपाणी यांच्या वाढदिवसानिमित्त धांदरफळ बुद्रुक येथे ७ हजार वृक्षांचे रोपण; विविध उपक्रमांनी सोहळा उत्साहात

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या मालपाणी परिवाराचे खंबीर नेतृत्व आणि प्रसिद्ध उद्योजक 'वृक्ष मित्र' मनीषभाऊ मालपाणी यांचा वाढदिवस संगमनेर तालुक्यातील धांदरफळ बुद्रुक येथे विविध सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमांनी अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे औचित्य साधून ग्रामपंचायत, लोकमान्य विद्यालय, स्वदेश उद्योग समूह, स्वदेश मित्रपरिवार, रामेश्वर देवस्थान विश्वस्त मंडळ आणि पंचशील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने तब्बल ७,००० वृक्षांचे रोपण करण्यात आले.

धांदरफळ बुद्रुक ग्रामपंचायतीचे हे अमृत महोत्सवी (७५ वे) वर्ष असल्याने संपूर्ण परिसरात ७५,००० वृक्षारोपणाचा संकल्प सोडण्यात आला आहे. याच मोहिमेअंतर्गत जेतवन, कारेश्वर डोंगर आणि रामेश्वर मंदिर परिसरात ७,००० रोपे लावली गेली. उद्योजक बाळासाहेब देशमाने यांनी 'हरित धांदरफळ, वृक्षमय धांदरफळ' असा नारा देत 'स्वदेश वृक्ष भेट' योजनेद्वारे नागरिकांना वृक्ष संवर्धन मोहिमेत सहभागी करून घेतले. वाढदिवसाचे औचित्य साधून लोकमान्य विद्यालय ते जेतवन परिसरात भव्य वृक्षदिंडी काढण्यात आली. लेझीम, झांज पथकाचा गजर आणि वृक्ष संवर्धनाचे संदेश देणाऱ्या फलकांसह विद्यार्थी या दिंडीत उत्साहाने सहभागी झाले.

विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मनीष मालपाणी म्हणाले, माणसाच्या कर्माला योगाची जोड मिळाली की तो कर्मयोगी ठरतो. खांडगावचा 'वन ट्री डोंगर', धांदरफळचा 'कारेश्वर डोंगर' आणि करे घाट परिसर हरितमय करण्यात सर्वांचा मोठा वाटा आहे.

तसेच विद्यार्थ्यांनी शिकण्याची जिद्द ठेवून आधुनिक संगणकीय ज्ञानावर भर दिला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. धांदरफळ परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी मालपाणी परिवाराकडून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात सढळ हस्ते मदत करण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी रू. ६ लाखांचे डिजिटल संगणक लॅब,

लोकमान्य विद्यालयासाठी रू. १० लाखांचे इंटरॅक्टिव्ह पॅनल, रामेश्वर देवस्थान येथे नवीन श्रीराम मंदिर निर्माणसाठी रू. २० लाख, प्रवरा नदी घाटासाठी रू. ५ लाखांची विद्युत रोषणाई, जेतवन परिसर व वृक्षारोपणासाठी रू. २१,००० परिसराचे सुशोभीकरण यांचा समावेश आहे. यापूर्वी कारेश्वर डोंगरावर ५१ हजार झाडे लावून हा परिसर हिरवागार करणाऱ्या मालपाणी परिवाराचे ग्रामस्थांनी विशेष आभार मानले.

यात्रसंगी सुवर्णा काकी मालपाणी, गिरीशभाऊ मालपाणी, रचनाताई मालपाणी, जय मालपाणी, सरपंच



उज्ज्वला देशमाने, उपसरपंच भारत कोल्हे, बाळासाहेब देशमाने, भाऊसाहेब जी. डेरे, प्राचार्य, रामेश्वर देवस्थान अध्यक्ष सुनील देशमुख विश्वस्त मंडळ, स्वदेश युवा प्रतिष्ठान सर्व शिलेदार, स्वर्गीय मुरलीधर बापूजी वलवे लोकमान्य विद्यालय प्राचार्य एकनाथ झावरे, शिक्षक , विद्यार्थी , माता , पालक समिती सदस्य मंडळ आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता कासार यांनी तर आभार बाळासाहेब जाधव यांनी मानले. धांदरफळ परिसराला निसर्गरम्य बनवण्यात मालपाणी परिवाराचा सिंहाचा वाटा असून संपूर्ण धांदरफळकरांच्या वतीने मालपाणी परिवाराचे मनःपूर्वक धन्यवाद व्यक्त करण्यात आले.

## डॉ.विखे अभियांत्रिकी प्रथम वर्ष ९९.२१% टक्के निकाल

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

विळद घाट येथील डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीचा प्रथम वर्षाचा निकाल ९९.२१% टक्के लागला आहे. ६३० विद्यार्थ्यांपैकी ६२५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

या निकालातील विशेष बाब म्हणजे २७६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी विशेष प्राविण्यासह यश मिळविले असून, ३७ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, तर उर्वरित विद्यार्थ्यांनी उच्च द्वितीय व द्वितीय श्रेणीत यश संपादन केले आहे. केवळ ५ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले. अनुपस्थित विद्यार्थ्यांची संख्या शून्य आहे.

महाविद्यालयातील सातत्यपूर्ण शैक्षणिक नियोजन, नियमित मार्गदर्शन, गुणवत्तापूर्ण अध्यापनामुळे निकालाची उत्कृष्ट परंपरा कायम राहिली.

या निकालाबाबत फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले. आजचा उत्कृष्ट निकाल हा केवळ आकड्यांचा विजय नसून गुणवत्ता, शिस्त, कठोर परिश्रम आणि उत्कृष्ट शैक्षणिक संस्कृतीचा विजय आहे. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाची निवड करताना केवळ जाहिराती किंवा बाह्य आकर्षण न पाहता, विद्यापीठाचा निकाल, अनुभवी प्राध्यापक, संशोधन, नवोपक्रम आणि प्लेसमेंट यासारख्या वस्तुनिष्ठ निकषांचा विचार केला.

डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशन विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे, उद्योगाभिमुख आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असते.

## जुन्नर न. पा. येथे आयुष्यमान कार्ड व आभा कार्ड मुख्याधिकारी कोल्हे यांच्या हस्ते वाटप

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगरपरिषद येथे गुरुवार दि. ६ दु . १:३० वा . ५६० आयुष्यमान कार्ड व आभा कार्ड मुख्याधिकारी चरण कोल्हे उपस्थित नगरसेवकांच्या हस्ते वाटप करण्यात आले .

जुन्नर शहरातील सर्व प्रभागांमध्ये या योजनेचा शिबिराचे आयोजन नगरसेवकांनी ताबडतोब कराव.यामुळे सर्व नागरिकांना व रुग्णांना याचा लाभ होईल . रुग्णांची सेवा हीच ईश्वर सेवा आहे या माध्यमातून नागरिकांनी आयुष्यमान कार्ड व आबा कार्डफॉर्म भरून घ्या अशी आव्हान मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी यावेळी केले .

कुठल्याही गंभीर आजारावर पाच लाखापर्यंत खर्च केंद्र सरकार आयुष्यमान कार्ड या माध्यमातून करत आहे .

भारतातल्या कुठल्याही सरकारी दवाखान्यात केस पेपर चे काम आबा कार्ड काम करत आहे



असे नगरसेविका अलका फुल पगार यांनी यावेळी सांगितले .

दिनांक ९ ,१० , ११ व १२ या दिवशी सकाळी नऊ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत क्रांती चौक सराई पेठ प्रभागामध्ये आयुष्यमान कार्ड व आभा कार्ड भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे असे भाजप नगरसेवक अनिल रोकडे यांनी यावेळी सांगितले. यावेळी सुम्मया शेख , ललिता वाघमारे , अक्षय बांगर , रुक्मिणी बांगर , निवृत्ती बांगर यांना आयुष्यमान कार्ड व आभा कार्ड मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले.याप्रसंगी नगरसेवक वाजिद इनामदार , प्रशांत सराईकर , आकिब इनामदार , नगरपालिका कर्मचारी ,सफाई कामगार ठेकेदार अझिम तिरंदाज , व सर्व लाभार्थी उपस्थित होते.

## मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे 'संगीत साधक पुरस्कार

**अकोले (समर्थ गांवकरी)**

वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ कीर्तनकार ह.भ.प. गुरुवर्य बापूरावजी धामणीकर गुरुजी यांच्या स्मरणार्थ प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'संगीत साधक पुरस्कार' श्री अगस्ती ऋषी अध्यात्मिक गुरुकुल, अकोलेचे संस्थापक–अध्यक्ष ह.भ.प. मृदंगाचार्य संकेत महाराज आरोटे यांना प्रदान करण्यात आला.

पुणे येथील कोंढवा येथे ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पानसरे गुरुजी यांच्या हस्ते येथे आयोजित विशेष समारंभात प्रदान करण्यात आला. यावेळी माजी नगरसेविका सौ. रंजनाताई टिळेकर, उद्धव बापू शिंदे, ऋषी पानसरे सह अनेक मान्यवर उपस्थित होते.

संकेत महाराज आरोटे हे वारकरी संप्रदायातील नामवंत मृदंग व पखवाज वादक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात परिचित आहेत. राज्यभर होणाऱ्या कीर्तन, भजन, हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रमांमध्ये त्यांच्या पखवाज वादनाची साथ अत्यंत मानाची समजली जाते. समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर यांच्या झी टॉकीजवरील कीर्तन कार्यक्रमांनाही साथसंगत केली असून अनेक नामवंत कीर्तनकार व भजनसम्राटांसोबत ते सातत्याने संगीतसेवा बजावत आहेत. आरोटे यांनी पखवाज व तबला विषयात विशारद, संगीत विषयात एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. संगीत क्षेत्रातील त्यांची प्रामाणिक व निष्ठापूर्ण साधना, पखवाज वादनावरील उत्कृष्ट प्रभुत्व आणि वारकरी संप्रदायाच्या



सेवेसाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदाना साठी हा पुरस्कार मिळाला आहे.

त्यांच्या या यशाबद्दल समाजप्रबोधनकार राष्ट्रीय धर्माचार्य ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर), विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर, अगस्ती ऋषी देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष ड. के. डी. धुमाळ, विश्वस्त ह.भ.प. दीपक म. देशमुख, गणेश म. वाकचौरे, श्री. रामनाथ मुतडक, किरण म. शेटे, नितीन म. गोडसे, सोमनाथ म. भोर, रमेश म. भोर, प्रदीप भाटे, कुलदीप नेवासकर तसेच अकोले व संगमनेर तालुक्यातील कीर्तनकार, प्रवचनकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## दिव्यांग व अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

दिव्यांग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याकरिता या योजनेअंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या पात्र जोडप्यांनी अर्ज करण्याचे आवाहन सहायक आयुक्त मुंबई उपनगर दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांनी केले आहे.

या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी विवाह नोंदणी दाखला, वर व वधू यांचे शाळा सोडल्याचे दाखले, वर अथवा वधू यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र, वर व वधू यांचे एकत्रित लग्नातील छायाचित्र, दोन प्रतिष्ठित व्यक्तींची शिफारसपत्रे, वर व वधूचे महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, वर व वधूचे पोस्ट ऑफिसमधील संयुक्त खाते पासबुकची छायांकित प्रत, वर व वधूचे राष्ट्रीयकृत बँकेतील संयुक्त खाते पासबुकची छायांकित प्रत या कागदपत्रांसह अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

इच्छुकांनी अर्जासाठी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय, मुंबई उपनगर, प्रशासकीय इमारत, चौथा मजला, आर. सी. मार्ग, चेंबूर (पू.), मुंबई–७१ येथे संपर्क साधावा. या योजनेच्या अर्जाचे नमुने संबंधित कार्यालयात उपलब्ध होतील, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# स्व. अजितदादा पवार यांच्या विचारांना क्रीडांगणातूनही अभिवादन

## आमदार काशिनाथ दाते सरांच्या हस्ते विजेत्यांचा गौरव

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

गुरुवार दि. ६ ऑगस्ट २०२६ स्व. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त पारनेर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांपैकी स्व. अजितदादा पवार स्मृती चषक पावसाळी क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना व बक्षीस वितरण सोहळा राळेगण थेरपाळ येथे पार पडला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या संकल्पनेतून पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला खेळाडू व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यात साईराम ११, शिरूर आणि मांडवगण फराटा या बलाढ्य संघांमध्ये रंगतदार लढत झाली. प्रथम फलंदाजी करत साईराम ११, शिरूर संघाने ७३ धावांचे आव्हान उभे केले. मात्र हे आव्हान समर्थपणे पेलत मांडवगण फराटा संघाने शानदार खेळी करत अंतिम सामना जिंकून स्व. अजितदादा पवार स्मृती चषक आपल्या नावावर केला. अंतिम सामन्याने उपस्थित क्रीडाप्रेमींना शेवटच्या क्षणापर्यंत खिळवून ठेवले.

स्पर्धेच्या अंतिम सामन्यास पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन दिले तसेच विजेत्या व उपविजेत्या संघांना पारितोषिकांचे वितरण केले. यावेळी त्यांनी अमर रहे... अमर रहे... अजितदादा अमर रहे...! एकच वादा... अजितदादा...! राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो...! अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून सोडत उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, जिल्हा परिषदचे माजी सदस्य वसंतराव चेडे, जिल्हा सरचिटणीस सुधामती कवाद, लाडकी बहीण योजनेचे तालुकाध्यक्ष सुनील थोरात, नगरसेवक अशोक चेडे, तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, दिनेश बाबर, उपाध्यक्षा रेश्मा गलांडे, रमेश वरखडे, स्वप्नील ठुबे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रीडाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात्रसंगी आमदार काशिनाथ दाते म्हणाले, स्वर्गीय अजितदादा पवार यांनी युवकांना नेतृत्व, विकास आणि समाजसेवेची प्रेरणा दिली. क्रीडा स्पर्धा केवळ मनोरंजनासाठी नसून युवकांमध्ये शिस्त, संघभावना आणि जिद्द निर्माण करणारे प्रभावी माध्यम आहे. अशा विधायक उपक्रमांमधून सक्षम व सुसंस्कृत पिढी घडते. विकास पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेले उत्कृष्ट आयोजन निश्चितच कौतुकास्पद आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते यांनी अंतिम फेरीत उत्कृष्ट खेळ करणाऱ्या साईराम ११, शिरूर आणि विजेता मांडवगण फराटा या दोन्ही संघांचे विशेष अभिनंदन केले. तसेच स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी आर्थिक सहकार्य करणारे सर्व दाते, प्रायोजक, संघमालक आणि सहकार्य करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे नावानिशी आभार मानत त्यांच्या



> स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेली ही क्रिकेट स्पर्धा म्हणजे युवकांना एकत्र आणणारा आणि त्यांच्या अंगी असलेल्या क्रीडा गुणांना वाव देणारा प्रेरणादायी उपक्रम आहे. विकास पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन करून स्पर्धेला भव्य स्वरूप दिले आहे. आमदार मा. काशिनाथ दाते सर यांच्या मार्गदर्शनाखाली अशा विधायक उपक्रमांमधून राष्ट्रवादी काँग्रेस समाजहिताची आपली बांधिलकी अधिक प्रभावीपणे जपत आहे.
>
> **– अशोकराव सावंत (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस)**

योगदानाचे विशेष कौतुक केले.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी विकास पवार, नाणू सोनवणे, मोतीराम कारखिले, मयूर तिखोळे तसेच राळेगण थेरपाळच्या सर्व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. उत्कृष्ट नियोजन, भव्य पारितोषिके आणि शिस्तबद्ध व्यवस्थापनामुळे या स्पर्धेने तालुक्यात विशेष छाप पाडली असून, युवकांना विधायक दिशेने प्रेरित करणारा हा उपक्रम म्हणून सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.